### 3.3.1 Number of research papers published per teacher in the Journals notified on UGC CARE list during the last five years (05 Research Paper remain to add previous DVV file)

| Sr. No | Name of the Paper | Translation in English | Author Name | Journal Name |
|---|---|---|---|---|
| 1 | Alok: Aajche 'Swastyeharak' Samajvastav | Alok: Today's "Health-Threatening" Social Reality | Dr. Sudhir More | Bhav Anubandh |
| 2 | 96 Metromall'- Upbhogwadi Jagnyachi Adbhutika | "96 Metromall" - The Mystique of Consumerist Living | Dr. Sudhir More | Bhav Anubandh |
| 3 | Alok' che Bhashik Samarthya | The Linguistic Competence of 'Alok' | Dr. Sudhir More | Maharashtra Sahitya Patrika (Print Only) |
| 4 | Kalekarde Stroks: Ek Udas Pokli | Black strokes: A gloomy hollow | Dr. Sudhir More | Bhav Anubandh |
| 5 | Bhāṣēcā abhikṣētrīya va kālika vitaraṇācā abhyāsa | A study of spatial and temporal distribution of language | Dr. Sudhir More | Bhav Anubandh |

मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned by CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ८ अंक : २

पौष, माघ, फाल्गुन शके १९४३
जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २०२२

---

संपादक : श्री. भीमसेनराव माड्याळकर
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

---

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned by CamScanner

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म'मधील भगवान बुद्धांची सौंदर्यसृष्टी / प्रो. डॉ. शशिकान्त लोखंडे ७
- १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनात्मक कादंबरीतील विजिगीषू वृत्ती/ प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात २४
- आलोक : आजचे 'स्वास्थ्यहारक' समाजवास्तव / डॉ. सुधीर बब्रुवान मोरे ३३
- समकालीन ग्रामीण दलित स्त्रीवादी कथा / प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर ४३
- धोंडी (कथा) / युवराज मेघराज पवार ४७
- स्वातंत्र्य कधी, कुणामुळे मिळाले ? (हे काय आता विचारायचे प्रश्न आहेत ?) / डॉ. विजय पांढरीपाडे ५६
- दो गज जमी/ वसुंधरा दशरथराव सुत्रावे ६०
- कविता.... कविता.... कविता.... कविता.... ६५
- फ. मुं. नावाचं माणूसपण...! / माधुरी अशिरगडे ७०
- अक्षता / मीनाक्षी बक्षी ७४
- जलसाक्षरता आणि 'नवी प्रतिज्ञा' / डॉ. विलास पाटील ८२
- नवोदित गझलकारांना मार्गदर्शक आणि परिपूर्ण गझलसंग्रह - उर्मिला / प्रकाश रामचंद्र क्षीरसागर ९१
- मंडळाची वाटचाल..... ९४


Scanned by CamScanner

# आलोक : आजचे 'स्वास्थ्यहारक' समाजवास्तव

• डॉ. सुधीर बब्रुवान मोरे

**प्रास्ताविक**

आसाराम लोमटे हे आघाडीचे समकालीन मराठी कथाकार आहेत, त्याचबरोबर 'लोकसत्ता' या दैनिक वर्तमानपत्राचे ते परभणी येथील वार्ताहर आहेत. त्यांचे आजवर 'इडा पिडा टळो' (२००६), 'आलोक' (२०१०) हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'आलोक' या कथासंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार (२०१६) प्राप्त झाला आहे. 'धूळपेर' (२०१७) हा त्यांचा लेखसंग्रह असून 'तसनस' ही त्यांची अलीकडे प्रकाशित झालेली कादंबरी आहे.

'दुष्काळ झळा : निवडणुकीच्या रंगीबेरंगी सतरंजीखाली दडवलेला कचरा' हा आसाराम लोमटे यांचा लेख २०१९ सालच्या एप्रिलमध्ये लोकसत्तेत प्रसिद्ध झाला. पुढे आसाराम लोमटे यांनी 'साधना'मध्ये दुष्काळावर ९ लेख लिहिले. हे लेख लिहिण्यापूर्वी आसाराम लोमटे ह्यांनी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांना भेटी दिल्या. जिथून मध्य प्रदेशाची हद्द दिसते, अशा वरूड तालुक्यातल्या सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या गावांपासून ते नेहमीच दुष्काळ सोसणाऱ्या माणदेशातल्या अनेक गावांपर्यंत या निमित्ताने ते फिरले. ४५-४६ अंशापर्यंत तडकलेल्या चढत्या भाजणीच्या उन्हात जगण्याचा संघर्ष करणाऱ्या व दुष्काळ सोसणाऱ्या आणि दुष्काळाशी दोन हात करणाऱ्या जनतेशी त्यांना संवाद साधता आला.

आसाराम लोमटे हे प्रत्यक्ष समाजात वावरत असल्यामुळे समाजातल्या अडीअडचणी, ताणेबाणे, वेदना, दुःख, दारिद्र्य, राजकारण या सर्वांचे अगदी जवळून निरीक्षण केलेले आहे. 'आलोक' या कथासंग्रहाचे शीर्षक याच अनुषंगाने येते. कथाकार आजूबाजूला ज्या सूक्ष्म पद्धतीने निरीक्षण करतो आहे, त्याच अनुषंगाने त्याच्या साहित्यातील आशयसुद्धा येताना दिसतो. 'आलोक'ला इंग्रजीत



Scanned by CamScanner

Perspective असे म्हणतात. यासाठी 'परीदर्शन' असाही शब्द वापरतात. दिसणारा, जाणवणारा असा एखादा भाग वर्णन करणे, चित्रित करणे हे एक आलोक किंवा परीदर्शन असते. उदा. एखाद्या समाजाचे अनेकविध बाजूंनी निरीक्षण करून, त्याचे नेमके स्वरूप चित्रित करणे हा त्या समाजाचा परीदर्शन अगर परिप्रेक्ष्य आलोक होईल. या अनुषंगाने आसाराम लोमटे यांचे कथालेखन येते.

## 'आलोक'मधील आशय

'आलोक' या कथासंग्रहात चिरेबंद, ओझं, खुंदळण, कुभांड, जीत, वळण अशा सहा कथा आहेत. आसाराम लोमटे आपल्या कथांमधून केवळ घटनाच सांगत नाहीत तर घटनेबरोबरच येणाऱ्या व्यक्तिरेखाटनाच्या माध्यमातून माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तींवर भाष्य करतात. या वृत्ती-प्रवृत्तीवर माणसांचे वर्तन अवलंबून असते.

'चिरेबंद' या कथेत हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हुतात्मा बनल्याची नोंद असलेल्या आजोबांचा सन्मान स्वीकारण्यासाठी आलेल्या नातवाला घडलेल्या आजोबांच्या कर्तृत्वाची ही सत्यकथा आहे. प्रसादच्या मनात आजी आणि आजोबा यांच्याबाबत दोन प्रतिमा आहेत. पंत हे सावकार होते, लोकांच्या जमिनी हडपल्या म्हणून त्यांचा खून झाला अशी एक, तर दुसरी रझाकारांच्या विरोधात काम करत होते, त्यांच्या विरोधात लढणाऱ्याला बळ देत होते, म्हणून त्यांची हत्या झाली ही दुसरी प्रतिमा. आजीचेही तसेच. प्रसादच्या आईच्या मते, आजी खूप हट्टी आहे, स्वतःला जे वाटतं तेच ती करते. प्रत्यक्षात मात्र प्रसादला आजी अतिशय शांत, गंभीर, विचारी अशी दिसते. या साऱ्यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न प्रसाद करताना दिसतो. प्रसादला स्वतःच्या आईकडून आणि गावात आल्यावर काही लोकांकडून हे सारे संदर्भाचे धागे कळू लागतात. त्याची आजी चिरेबंदी वाडा सोडत नाही, ती चिवट आहे. नवऱ्याने शोषणातून सारा जमीन जुमला मिळविला आहे, याची तिला कल्पना आहे. ही आजीसुद्धा एकाकी तरीही चिरेबंद. प्रसादला मात्र हा पिढीजात वारशाचा वाडा, जमीनजुमला या कशाशीही नाते जोडून घ्यावे असे वाटत नाही. हे सारे शोषणातून एकवटलेले आहे, ही जाणीव त्याचा सदैव पाठलाग करते. तसे तो फक्त कुठेच म्हणत नाही; पण तशी हळूहळू त्याची धारणा पक्की होत जाते. काही मोजकेच दिवस थांबल्यानंतर तो एके दिवशी या चिरेबंद वाड्यातून बाहेर पडतो. या ठिकाणी गावात एखाद्या



Scanned by CamScanner

कुटुंबाकडे एकवटलेल्या सत्ता संपत्तीच्या हव्यासातून जन्माला आलेली शोषणाची रीत चित्रित झाली आहे.

'ओझं' ही या कथासंग्रहातील एक महत्त्वाची कथा आहे. आपल्यापेक्षा सात-आठ वर्षांनी मोठ्या; पण आत्महत्या केलेल्या शेतकरी भावाशी मुरलीशी प्राध्यापक भावानं केलेला संवाद असे कथेचे स्वरूप आहे. कथेत काहीही विलक्षण घडत नाही किंवा कुठंही धक्का देणारे प्रसंग नाहीत, तरीही अगदी पहिल्यापासून ही कथा उद्ध्वस्ततेचा एक भयाण अनुभव देते. थोरला भाऊ शेती पाहतो. धाकटा कुटुंबाला लागेल तशी मदत करीत राहतो. दोघा भावांचे भावबंध अतिशय मनोज्ञ येतात.

मुरलीला मुलीची चतुराची काळजी असते. तिने खूप शिकावं अशी त्याची इच्छा; परंतु ते जमत नाही. त्यामुळे तो कमालीचा दुखावला जातो. पावसा-अभावी वाया गेलेलं बियाणं, खासगी फायनान्स कंपनीकडून घेतलेलं कर्ज, त्यातच लागलेलं दारू पिण्याचं व्यसन असं सारं कथेत येतं. कुणाही संवेदनशील माणसाची झोप उडवण्याची ताकद या कथेत आहे. इतका हलवून टाकणारा, मनाच्या तळाशी सुरुंग लावणारा अनुभव आसराम लोमटे या कथेच्या माध्यमातून देतात.

'खुंदळण' ही डाव्या चळवळीतून प्रस्थापित राजकीय प्रवाहात आलेल्या दत्तराव या कार्यकर्त्याच्या घुसमटीची कथा आहे. 'जे बी पेरणीसाठी ठेवलं ते कधीच दळून खायचं नाही हा शिरस्ता लोकांनी पाळला, नसता दुष्काळाच्या तडाख्यातून बी वाचलं असतं का ? आपणही होतो एक बियाचं कणीस. किती दिवस आले-गेले, इतक्या वाहुटळी आल्या, किती हंगाम करपले तरी आपल्याला धक्का नव्हता. शेवटी आपण जात्यातून भरडून निघालोच. पीठ झालं आपलं. आता त्याचा होणार हुर्डा आणि आपल्याला कुणीही मळत राहणार, त्याला आता इलाज नाही.'[१] ह्या सुरुवातीच्या परिच्छेदातूनच कथेचे सूचन होते.

गावात आणि तालुक्याच्या राजकारणात मुख्य राजकीय प्रवाहापासून वेगळे राहून डाव्या चळवळीत काम करताना निवडणुकीच्या राजकारणात दत्तराव यांना कधी यश येत नाही, मात्र कौटुंबिक अडचणीच्या काळात प्रस्थापितांच्या कळपाकडे ओढला जातो, ते त्याला सामावून घेऊन मुलीच्या लग्नासाठी मदतही करतात; परंतु जिथे आपली वैचारिक नाळ जोडली आहे, त्या चळवळीपासून तुटल्यामुळे दत्तरावची अवस्था मोठी कठीण होते. नव्या कळपात मन रमत नाही



Scanned by CamScanner

आणि चळवळीतले जुने लोक भेटले की टोमणे मारतात, अशा परिस्थितीत मनाचा निश्चय करून तो ज्यांच्यापासून तुटलो त्या अप्पांना भेटायला जातो. त्यावेळी ते म्हणतात, 'दुसऱ्याच्या दावणीला चाऱ्यापाण्याची सोय झाली की लगेच पळतात. काही ढोरंच इतके हावरट की खुटा उपटून पळायची तयारी. मग जगता तरी कशाला ? माणसं पोट जगविण्यासाठी उन्हातान्हाचं राबतात. थोडं पाप केलं तरी पोट भरता येतं. काय गरज दिवस-रात्र रक्त ओकायची ? पण तसं नाही, कष्टकरी माणसं दोन वेळच्या पोटभर जेवणासाठी रक्ताचं पाणी करतात. बाया दोन-दोन महिन्यांची चिल्ली-पिल्ली झोळणीत टाकून मरमर मरतात. काय गरजय त्यांना इतकं सारं करण्यासाठी ? ही माणसं खंगून मरतील; पण कोणाच्या वळचणीला जाऊन उष्ट्यावर जगणार नाहीत. जे त्यांना कळतं ते तुम्हाला कळत नाही.'[२] बदलती राजकीय संस्कृती आणि आयुष्यभर तत्त्वनिष्ठ राहून केलेले राजकारण याचं दर्शन घडवणारी ही कथा आहे. विचारनिष्ठेपासून ढळलेल्या आणि अपराधी भावनेने ग्रासलेल्या दत्ताराव या कार्यकर्त्याचे भावविश्व अतिशय ताकदीने लोमटे यांनी विशद केले आहे.

'कुभांड' या कथेत गावातल्या राजकारणातून परस्परांचा काटा काढण्यासाठी सामान्य माणसाचा वापर कसा केला जातो याचे दर्शन घडते. गावातील सरपंच आणि मालपाटील या दोघांच्या सत्ता शर्यतीतून अंगणवाडी सेविका गवळणबाईच्या आयुष्याची कशी धूळधाण होते याचे चित्रण येते. सर्वसामान्य माणूस राजकारणी लोकांसाठी अतिशय स्वस्त झाला. कुठल्या घटनेचा कोण कशा पद्धतीने फायदा उठवेल हे आजच्या घडीला सांगता येत नाही, त्यामुळे आजची गावे ही या अनुषंगाने अतिशय स्फोटक झालेली आहेत. ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, जिल्हा परिषदेच्या शाळा, तलाठी या काम करणाऱ्या लोकांना राजकीय लोकांचा कधी बळी बनवला जाईल हे सांगता येत नाही.

'जीत' या कथेत ग्रामपंचायत सदस्याच्या मृत्युनंतरच्या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने घडणाऱ्या राजकारणाचा वेध घेतला आहे. या ठिकाणी राजकारणाचा ढासळत गेलेला स्तर घटनांवरून कथेत स्पष्ट होतो. पैसा, दारू, भावनिक राजकारण या साऱ्याचा वापर करून सत्ता राखण्याचा प्रयत्न कशा पद्धतीने होतो, याचे चित्रण येते. नवऱ्याच्या अपघाती मृत्यूनंतर राजकारणात पडायचे नाही अशी म्हणणारी कौसाबाई शेवटी विरोधी पक्षाकडून अर्ज भरते आणि निवडूनही येते.

'वळण' ही या कथासंग्रहातील अशीच आणखी एक महत्त्वाची कथा आहे. आसाराम लोमटे यांनी आपल्या कथांतून सातत्याने मराठवाड्यातील बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. शेळ्या घेऊन रानात जाणाऱ्या बापाची मुलगी प्रयाग. बापाची लाडकी पगन. आठव्या इयत्तेत शिकणाऱ्या प्रयाग उर्फ पगन या मुलीची ही कथा आहे. पगन शिष्यवृत्ती मिळालेली शाळेतली एकुलती एक मुलगी आहे. शिक्षणाची कमालीची ओढ आणि शिक्षणामुळंच आपलं भाग्य उजळणार आहे, याची समज आणि अंगभूत शहाणपणा तिच्याकडे आहे. वारंवार पडणारे दुष्काळ व या दुष्काळी परिस्थितीतही गरीब कुटुंबातील प्रयाग शिक्षणासाठी धडपडते आहे, तिला यामध्ये अनेक अडचणी येतात; पण त्यावरती मात करत शिकू इच्छिते. ती आपल्या वडिलांना म्हणते, 'दादा मला शिकायचंय ! ह्यो रानचा कोंडवाडा नगं मला.'[३] यामधून तिच्या मनातील शिक्षणाविषयीचा प्रबळ आत्मविश्वास दिसून येतो. आज ग्रामीण जीवनात जी उदासीनता दिसून येते, त्याचा परिणाम म्हणून मुलं-मुली शिक्षणाकडे झपाट्याने वळले आहेत. त्यांना शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय दिसत नाही. त्यातूनच ती त्याच्यासाठी धडपडत आहेत. आजचे शेतीचे वास्तव हे त्यांना लक्षात आल्यामुळे ती या व्यवस्थेकडे या दृष्टीने पाहते.

शेजारच्या गावात शाळेसाठी येणारी प्रयाग एकेदिवशी शाळेच्या वाटेवर घडलेल्या एका खुनाची साक्षीदार बनते आणि तिच्यासह तिच्या कुटुंबाचेही स्वास्थ्य हरवून जाते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शिकणाऱ्या प्रयागच्या मार्गात अडथळे येतात आणि या साऱ्या भानगडीत तिची शाळाच बंद होण्याची पाळी येते. तिची शाळा सुरू राहण्यासाठी तिच्या अडाणी वडिलांनी केलेले शर्थीचे प्रयत्न, शिक्षकांनी केलेली मदत या साऱ्याचे चित्रण कमालीचा अस्वस्थ अनुभव देते.

आजचा काळ आणि भवताल यांमधील आशय घेऊन आसाराम लोमटे आपल्या कथांना आकार देताना दिसतात. समाजातील वास्तव अतिशय सूक्ष्मपणे हेरण्याची दृष्टी यांच्याकडे आहे, त्यामुळे कथांमधील व्यक्तिरेखा, त्यांचे जगणे हे सगळे अतिशय प्रत्ययकारीपणे आपल्यासमोर आशयाच्या रूपाने येताना दिसते.

### 'आलोक'ची भाषाशैली

आसाराम लोमटे यांच्या कथेची भाषाशैली ही अतिशय महत्त्वाची आहे. त्यांनी कथेसाठी विचारपूर्वक शैली निवडलेली आपल्याला दिसून येते. ते त्यांच्या

भाषेबाबत म्हणतात, 'या पुस्तकातल्या कथांसाठी मी भाषेवर जास्त मेहनत घेतलेली आहे. पूर्णपणे ग्रामीण ढंगाची भाषा मी कधीच वापरत नाही. मी माझ्या वकुबाप्रमाणे भाषेची बऱ्यापैकी मोडतोड करण्याचा प्रयत्न करतो. 'आम्हाला तुमची भाषा समजत नाही', असे सांगणारे वाचक भेटत असल्याचा काही लेखकांना बऱ्याचदा अनुभव येतो. विशेषतः महानगरातल्या वाचकांची ही तक्रार असते. मला मात्र असा अनुभव नाही.'[४] याठिकाणी कथाकाराला जे म्हणायचं आहे ते वाचकांपर्यंत व्यवस्थितरीत्या पोहोचण्यासाठी भाषा हेच मुख्य माध्यम आहे आणि या माध्यमाचा खुबीने वापर केला तर त्याची परिणामकारकता जास्त असते. त्याच्यामुळे कथा ही वाचनीय होते. या संदर्भात ते म्हणतात, 'मी त्या भाषेतली वाचनीयता टिकवण्याचा प्रयत्न करतो. तसंच त्या सगळ्या परिसराचं वळण त्या भाषेला देण्याचा; पण नागर व ग्रामीण या दोन्ही भाषांची मोडतोड करून ती भाषा माझ्या पद्धतीने घडवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे माझी भाषा दुर्बोध असल्याचं, अनाकलनीय असल्याचं, समजत नसल्याचं सांगणारं मला कोणी भेटत नाही.'[५] यावरून कथाकाराचे भाषाशैलीच्या संदर्भातील असणारे महत्त्व विशद होते.

**चित्रमयता**

आसाराम लोमटे यांच्या भाषाशैलीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या भाषेतून येणारी चित्रमयता. लोमटे कथेतील प्रसंग आपल्यासमोर प्रत्यक्ष उभा करतात. उदाहरणार्थ, 'चिरेबंद' या कथेतील पुढील वर्णन. 'समोरून एक भली मोठी दांडगी बाई येताना दिसली. आजवर इतकी दांडगी बाई मी पाहिली नव्हती, वय बरंच, कपाळ पांढरं फटफटीत म्हणजे विधवा असावी. आता उतारवयाकडे लागलेली; पण चालण्यातला जोम भलताच. तिने आजीला पाहिलं अन् थांबली. आजीही थबकली. घसा खाकरून ती बाई मोठ्याने थुंकली. पायातल्या चपलेनं जमीन रगडली अन् काहीतरी वाईटसाईट बोलून निघून गेली'[६] या ठिकाणी हा प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष उभा राहतो. ही ताकद आसाराम लोमटे यांच्या भाषेत आहे, हे जाणवते.

**प्रतिमासृष्टी**

'आलोक'मधील प्रतिमासृष्टी हा एक स्वतंत्र निबंधाचा विषय होऊ शकतो, इतक्या विपुल प्रतिमा या कथासंग्रहात आलेल्या दिसून येतात. प्रतिमा म्हणजे चित्र, मूर्ती किंवा प्रतिबिंब होय. आपण जेव्हा एखादी वस्तू पाहतो तेव्हा



Scanned by CamScanner

आपल्याला त्याचे इंद्रीयगोचर स्वरूप जाणवते; परंतु ती वस्तू डोळ्यांसमोर नसताना आपण तिच्या रंगरूपाचे चित्र मनःचक्षुसमोर आणू शकतो. आपल्या मनःचक्षुसमोर येणाऱ्या या चित्राला मनोविज्ञानामध्ये प्रतिमा म्हणतात. विसदृश्य कल्पनांचा संयोग घडवून आणणे, भावनिक व्यामिश्रतेची यथार्थ अभिव्यक्ती करणे ही प्रतिमांची वैशिष्ट्ये ठरतात. या अनुषंगाने आसाराम लोमटे यांनी प्रतिमासृष्टी या ठिकाणी निर्माण केलेली आहे, ती अतिशय महत्त्वाची आहे. ही प्रतिमासृष्टी इंद्रियसंवेदनात्मक अनुभूतीची प्रतिती कशी देते यासाठी काही उदाहरणे आपल्या समोर ठेवतो.

'चिरेबंद' या कथेतील पुढील उदाहरण -

- पाऊस सारखा छपराची माती गळत असल्यासारखा भुरुभुरु गळतोय. (पृ.१०)
- कंदिलाची वात आळोखे पिळोखे देत जळते आहे. (पृ.१२)
- कुणीतरी ढकलून दिल्यागत मी दरवाजाबाहेर पाऊल टाकलं आणि पांढरा नंदी पाठीमागं लागल्यासारखा वेगानं पायऱ्या उतरत खाली आलो. (पृ.३१)

या शब्दांत कथा संपते. या ठिकाणी आलेली पांढऱ्या नंदीची प्रतिमा ही अघोरी संपत्तीचे सूचन करते.

'ओझं' या कथेतील

- गाडी ओढणाऱ्या बैलानं शिवळा-जोत्यातून मान काढून भर रस्त्यात गाडी सोडून जावं तसं तुझं निघून जाणं झालं. (पृ. ३३)
- तू गेलास आणि वहिनीच्या उभ्या जन्माचा उन्हाळा केलास. (पृ. ३३)

'खुंदळण' या कथेतील

- अश्या टिचऱ्या गोट्या आमच्या डावात नगं. (पृ. ५७)

या ठिकाणी दत्तारावचा मुलगा संजू बाहेर मुलांमध्ये खेळत असताना लिंबाजीचा मुलगा संतु आमच्या बरोबर खेळू नको हे सांगत असताना वरील विधान करतो. 'टिचरी गोटी' ही जी प्रतिमा आहे ती या ठिकाणी दत्तारावचे प्रस्थापित पक्षातील पक्षांतर करण्याच्या निर्णयावर केलेले हे भाष्य आहे. कार्यकर्त्याचे टिचलेपण त्यातून उठावदारपणे येते.

- आता कात टाकल्यावनी लागा बरं कामाला अन् इकडे तिकडे हिंडताना, गावात फिरताना आमच्यासंग राहत जा बर. असं पान्हा चोरनं बस झालं आता. (पृ. ५९)

या ठिकाणी दत्ताराव जरी प्रस्थापित पक्षात गेले असले तरी त्या ठिकाणी त्यांना

काम करत असताना म्हणावे तितके सहजपण आलेलं नाही. या ठिकाणी जी प्रतिमा निर्माण केली आहे ती जनावर दूध देत असताना ज्या पद्धतीने नवीन माणूस त्या ठिकाणी आला तर ते पान्हा आटवते किंवा चोरते. या ठिकाणीही अशाच पद्धतीचे वर्णन करून दत्तारावची मानसिकता स्पष्ट होते. वरील सर्व प्रतिमांमधून इंद्रियसंवेदनात्मक अनुभूतीची प्रतिती येते.

## सूचकता

आसाराम लोमटे त्यांच्या कथांमध्ये अनेकदा आशयाच्या अनुषंगाने सूचकता दाखवतात आणि ही सूचकता प्रसंगानुरूप त्या ठिकाणी वाचकांना विचार करायला लावते.

'चिरेबंद' या कथेतील प्रसाद हा आपल्या मूळगावी गेलेला असताना शेतात जातो. त्यावेळी रस्त्यात भेटलेल्या एक व्यक्तीला गडी ओळख करून देताना, 'हे पंतांचे नातू' अशी ओळख करून देतो. त्यावेळी ती व्यक्ती प्रसादकडे पाहून म्हणते, 'कशाला येतोस बाबा इकडं नुसता फुपाटाय... सगळ्या आयुष्याची पायपोळ व्हायची. जमिनीची तहान पंतालाही होती; पण जिवापेक्षा भारी असून काय कामाची ? त्यात पुन्हा तुमच्या जमिनी तशा. काटकिंजाळ केकताडात कशाला घालायचा हात ?'[७]

या ठिकाणी पंतांची जमिनीची हाव किंवा भूक सूचित होते. त्याचबरोबर पंताचा मृत्यू सुद्धा या जमिनीच्या वादातून झाल्याचे सूचन करते आणि भविष्यातही या जमिनीची अपेक्षा ठेवणे म्हणजे स्वतःचे मरण ओढवून घेण्यासारखं आहे, अशा पद्धतीचं सूचन या ठिकाणी होताना दिसते. या ठिकाणी जी प्रतिमा निर्माण केली आहे ती महत्त्वाची आहे, 'काटकिंजाळ केकताडात' ही जी प्रतिमा आहे याठिकाणी केकताडात मोठ्या प्रमाणावर साप वास्तव्याला असतात हे सूचन या ठिकाणी महत्त्वाचे होते

असेच आणखी एक 'चिरेबंद' मधील उदा. प्रसाद हा शेतातील गड्याशी चर्चा करत असताना वादातील जमिनी ताब्यात घेण्यासंदर्भात व त्या नांगरण्याबाबत बोलतो. त्यावेळी तो गडी म्हणतो, 'मालक आता ह्या जमिनीमध्ये औत घालायचं म्हणजे वारूळातच हात घातल्यावानी हाय.'[८] या ठिकाणी हे सूचन आपल्याला लक्षात येते.

## निवेदनशैली

आसाराम लोमटे यांच्या कथेतील निवेदनशैलीचा विचारही महत्त्वाचा

ठरतो. कादंबरीप्रमाणे कथेतल्या निवेदकाला निवेदनातून वातावरण निर्मिती करण्यासाठी मोठा अवकाश उपलब्ध नसतो, कमी अवकाशात त्याला वातावरण निर्मिती करावयाची असते. इथे पाल्हाळीकतेला जास्त वाव नसतो, त्यामुळे निवेदनशैली महत्त्वाची ठरते आणि त्या अनुषंगाने आसाराम लोमटे यांच्या कथेतील निवेदनशैली ही अतिशय प्रभावी परिणामकारक ठरताना दिसते.

## समारोप

एकूणच आसाराम लोमटे वेगळ्या वाटेने जाऊन माणसांच्या मनाचा तळ गाठण्याचा प्रयत्न करतात आणि तो गाठता गाठता वाचकाच्या मनाचा तळ हलवून टाकतात. माणसांच्या जगण्याविषयी, नातेसंबंधांविषयी, त्याच्या संघर्षाविषयी कमालीच्या आस्थेनं आणि आत्मियतेनं ते लिहिताना दिसतात. त्यांच्या कथा ह्या माणसाच्या अंतःकरणापर्यंत जाऊन संवेदनशील वाचकाच्या मनात काही प्रश्न उपस्थित करतात, त्यांना अस्वस्थ करतात. ते आपल्या लेखनामागील भूमिका विशद करताना म्हणतात, 'बाजारात भलेही 'स्वास्थ्यकारक' जगण्याची उत्पादने भरमसाठ असतील; पण लेखकाने मात्र 'स्वास्थ्यहारक'च लिहावे. वाचून प्रश्न पडावा, झोप उडावी, अगणित भुंग्यांचे मोहोळ उठावे आणि त्याने वाचणारालाही दंश करावा असे लिहिण्यासाठी मी धडपडतो आहे.' अशा पद्धतीने भवतालात जाणवणाऱ्या वास्तवाला कवेत घेऊन त्याला कथात्मक रूप देऊन वाचकांना अस्वस्थतेचा अनुभव आसाराम लोमटे त्यांच्या कथांच्या माध्यमातून देतात.

## संदर्भ

१) आसाराम लोमटे, आलोक, शब्द पब्लिकेशन, चौथी आवृत्ती, डिसेंबर २०१७, पृ. ५५.
२) तत्रैव, पृ. ७७, ७८.
३) तत्रैव, पृ. १५३.
४) मुक्त शब्द, जानेवारी २०१७, पृ. १२.
५) तत्रैव, पृ. १३.
६) आसाराम लोमटे, उनि, पृ. ११.
७) तत्रैव, पृ. ११.
८) तत्रैव, पृ. २२.



Scanned by CamScanner

१) मुक्त शब्द, मार्च २०१७, पृ. ६१.

- डॉ. सुधीर बब्रुवान मोरे,
साहाय्यक प्राध्यापक (मराठी),
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.
मोबा. : ९४२२०००६११

★ ★ ★

## फॉर्म ४ (नियम ८) अन्वये निवेदन

१. प्रकाशनाचे नाव : भाव अनुबंध
२. प्रकाशनाचे स्थळ : गुलबर्गा (कर्नाटक)
३. प्रकाशनाचा काळ : त्रैमासिक
४. प्रकाशनाची भाषा : मराठी
५. संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
६. नागरिकत्व : भारतीय
७. मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता :
श्री. भीमसेनराव माड्याळकर, अध्यक्ष
मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा ५८५१०२. (कर्नाटक)
८. नागरिकत्व : भारतीय
९. मुद्रणस्थळ : साई समर्थ प्रिंटर्स
दुकान क्र. ४ विठ्ठल हाईटस्, हिंगणे (खुर्द), पुणे ५१.
१०. मालकाचे नाव व पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा ५८५१०२. (कर्नाटक)

मी, सर्वोत्तम सताळकर जाहीर करतो, की वरील सर्व तपशील माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

गुलबर्गा
दि. २८-२-२०२२

सही/-
सर्वोत्तम सताळकर

## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Bhav Anubhandh (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | भाव अनुबंध (print only) |
| **Publication Language** | Marathi |
| **Publisher** | Marathi Sahitya Mandal |
| **ISSN** | NA |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Arts and Humanities (all) |
| **Focus Subject** | Literature and Literary Theory |

Copyright © 2022 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer

मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned by CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : १० अंक : ३

चैत्र, वैशाख, ज्येष्ठ शके १९४६
एप्रिल, मे, जून २०२४

---

मानद संपादक : श्री. पवनकुमार देशपांडे
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ सौ. वंदना किणीकर
डॉ. योगेश्वर देशपांडे ★ सौ. शीतल देऊळगावकर

---

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ,** स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२. दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७
email-satalkar.sarvottam@gmail.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

( संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned by CamScanner

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : संधी आणि आव्हानं / डॉ. अनंत दत्तात्रय चिंचुरे ६
- '९६ मेट्रोमॉल' - उपभोगवादी जगण्याची अद्‌भुतिका / डॉ. सुधीर ब. मोरे १२
- मराठी पुस्तक प्रकाशनातील अवलिया चित्रकार - दीनानाथ दलाल / श्री. शैलेश मांडरे २०
- पत्रकार दत्ता सराफ यांच्या 'ऐवज' आत्मचरित्राचे आकलन / श्री. निलेश भाऊसाहेब वाकचौरे ३२
- बबन मिंडे यांचे व्यक्तिमत्त्व व वाङ्मयीन योगदान / मनीषा दिनेश सुपेकर ४१
- प्रा. व्यंकटेश वळसंगकर : साहित्यातून घडणारे दर्शन/ सौ. वंदना किणीकर ५०
- लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. प्रभाकर मांडे / ऋता मनोज ठाकूर ५३
- केळीच्या साली / माला पारिसे ५७
- फादर फ्रान्सिस दिब्रिटो - एक प्रतिभावंत लेखक / सौ. मेधा विकास कुमार ६३
- महानुभाव संप्रदाय : कवी परंपरा व साहित्य (भाग १) / डॉ. सुरेश विनायक जाधव ६९
- कविता..... कविता..... कविता..... कविता..... ७६
- मित्रत्वाचं 'नातं' / विद्याधर मुरुगकर ८२
- पानगळ वसंताची / सौ. भारती सावंत ८४
- 'प्रिय, हा कण...' : स्त्रीच्या जगण्याच्या असंख्य मिती / प्रा. डॉ. विलास पाटील ८७
- मंडळाची वाटचाल.... ९५


Scanned by CamScanner

# ‘९६ मेट्रोमॉल’ – उपभोगवादी जगण्याची अद्‌भुतिका

● डॉ. सुधीर ब. मोरे

प्रणव सखदेव यांना मराठीतल्या आजच्या महत्त्वाच्या तरुण लेखकांमध्ये गणले जाते. प्रणव सखदेव यांनी कविता, कथा आणि कादंबरी हे तीनही सर्जनशील साहित्यप्रकार हाताळले आहेत. विविध दैनिकांच्या पुरवण्या, दिवाळी अंक आणि नियतकालिकांमधून त्यांच्या कथा-कविता सातत्याने प्रकाशित होतात. ‘काळेकरडे स्ट्रोक्स’ (२०१८), ‘९६ मेट्रोमॉल’ (२०२०), ‘चतुर’ (२०२२) ह्या त्यांच्या कादंबऱ्या, ‘निळ्या दाताची दंतकथा’, ‘नाभीतून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य’, ‘दिमित्री रियाझ केळकरची गोष्ट’ हे कथासंग्रह आहेत, तर ‘पायऱ्यांचा गेम आणि इतर कविता’ हा त्यांचा कवितासंग्रह आहे. प्रणव सखदेव यांना त्यांच्या लेखनासाठी विविध पुरस्कार मिळाले आहेत; त्याचबरोबर कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्यातर्फे दिली जाणारी २०१५-१६ सालासाठीची अभ्यासवृत्तीही प्राप्त झालेली आहे. ‘काळेकरडे स्ट्रोक्स’ या कादंबरीला २०२१ चा ‘साहित्य अकादमी युवा पुरस्कार’ प्राप्त झालेला आहे. तरुण पिढीची भाषा बोलणारा एक लेखक म्हणून प्रणव सखदेव यांच्या साहित्याकडे पाहावे लागते. ‘९६ मेट्रोमॉल’ ह्या कादंबरीत कल्पिताचा खेळ रचला असून अद्‌भुत, अनिर्बंध कल्पनाशीलतेचा वेगळा आविष्कार या ठिकाणी पाहायला मिळतो.

**कथानक**

कादंबरीच्या आरंभी एका पृष्ठाचा मजकूर छापला असून निवेदकाच्या पत्नीला ॲमेझॉन डॉट कॉमवरून मागवलेल्या कातडी बॅगेत कोंबलेल्या कागदांच्या बोळ्यात कादंबरी सापडते, अशी योजना केली आहे. ‘मयंक’ हा या कादंबरीतील नायक आहे. तो त्याच्या मोठ्या भावाच्या मित्राच्या बॅचलर्स पार्टीला जातो. ह्या पार्टीत भरपूर दारू उपलब्ध असते. मयंकचा मोठा भाऊ त्याला सावध करतो; पण मयंक दारू पिण्याच्या शर्यतीत भाग घेतो आणि वेगवेगळ्या प्रकारच्या दारूंना एकत्र करून त्या कॉकटेलचे एकावर एक पाच पेग रिचवतो. पार्टीतली पोरं चेकाळतात आणि ते या दोन स्पर्धकांना उत्तेजन देतात. अखेरीस मयंकचं पोट ढवळून येतं आणि तो भरल्या पार्टीत ओकारी करतो. मयंक स्वतःच्याच ओकारीत निपचित पडून राहतो आणि पडल्या पडल्या एका फँटसीच्या विश्वात तो पदार्पण करतो. या विश्वामध्ये तो निऑनसाइनमध्ये असणाऱ्या ‘९६ मेट्रोमॉल’मध्ये जातो आणि पुढे कथानक घडत जाते.

मयंकच्या स्वप्नातील घटनेचे धागेदोरे वर्तमानात आहेत. या स्वप्नात विविध प्रकारचे खेळ रचलेले आहेत. या खेळातूनच माणसाची वेगवेगळी रूपे आपल्याला दिसतात. मयंक ज्या मेट्रोमॉलमध्ये प्रवेश करतो त्या मेट्रोमॉलच्या प्रवेशद्वारावरच एक मोबाईलड्यूड त्याच्याशी संवाद साधतो. तो त्याला ‘मला धर, धर मला, धर धर...’ असं मोठ्याने म्हणतो आणि मयंक त्याच्या पाठीमागे मॉलमध्ये प्रवेश करतो. इथून तो या मेट्रोमॉलमध्ये जे विविध खेळ घडतात त्यामध्ये त्याची इच्छा असो नसो सहभागी होत जातो.

मयंकला खूप भूक लागलेली असते. मग तो एक बर्गर घेतो. त्यावर ‘हँडल विथ केअर’ असे लिहिलेले असते. ते खाता खाता मयंक एकदम लठ्ठच होऊ लागतो. त्याला स्वतःचे पाय दिसेनासे होतात. स्वतःचे हे रूप बघून तो घाबरतो. तेव्हा मोबाईलड्यूड त्याला म्हणतो, ‘तुझ्या ह्या विचित्र रूपाची तू सेल्फी काढ आणि ती फेसबुकवर पोस्ट कर, तिला खूप लाईक्स मिळतील.’ मयंकला सुरुवातीला ते पटत नाही मात्र नंतर त्याला ते पटते. आता तिथे दोन दोन मयंक अवतरतात. एक खरा तर दुसरा त्याची व्हर्चुअल प्रतिमा. ह्या दोघांची जुगलबंदी मजेदार आहे. उपभोक्ता समाजातली माणसं स्वतःच्या फोटोंद्वारे समाजात कशी जगतात, हे या ठिकाणी कादंबरीकार सूचित करतो.

पुढे मयंक एका तळ्याकाठी पोहोचतो. त्यात पाण्याऐवजी सर्वत्र क्रेडिटकार्ड सांडलेली असतात. तिथेच त्याला मोबाईलड्यूड दिसतो. त्याला मयंक आपल्या जाडपणावर उपाय विचारतो; पण मयंकचं ते अजस्र धूड बघून मोबाईलड्यूड पळून जातो. तेव्हा त्याच्या हातातली बॅग तो तिथेच टाकतो. त्या बॅगमध्ये मयंकला दूधी, बिटरूट आणि कारलं ह्यांचा मिक्स्ड ज्यूस सापडतो. तो पिऊन परत त्याच्या पूर्वीच्या स्थितीत येऊ लागतो. शेवटी तो लहान होत होत दहा इंचाचा होतो. त्या कार्डाच्या तळ्यात त्याला हालचाल दिसते. मयंक बघतो तर





Scanned by CamScanner

परतीचा मार्ग बंद होतो. मयंक मोबाईलडच्यूडच्या मागे जात असताना यांत्रिक आवाज सांगतो, 'सर, यू हॅव टू गो इन नाऊ. यू हॅव टू गो. यू कान्ट कम बॅक. भरपूर खरेदी करा. मजा करा.'[३] ही बाजारकेंद्री व्यवस्था आजच्या काळात कळीची भूमिका बजावताना दिसते.

**चंगळवाद**

पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करून आणि गरज नसलेल्या गोष्टी खरेदी करायला भाग पाडून आपलीच प्रसारमाध्यमे आपल्याच नागरिकांना चंगळवादाच्या दिशेने घेऊन चालली आहेत. जाहिरातीचा प्रेक्षक हा त्यांचा फक्त एक ग्राहक आहे. या ठिकाणी आपली क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करणारी आणि त्याला हातभार लावणारी एक मोठी यंत्रणा कार्यरत झालेली आहे. माध्यमांच्या जाहिरातदारांनी त्यांचे लक्ष्य समूह अत्यंत विचारपूर्वक निश्चित केले आहेत. स्त्रिया, लहान मुले आणि तरुण यांना डोळ्यांसमोर ठेवून जाहिरातीची पद्धतशीरपणे निर्मिती केली जाते ज्यामुळे हा वर्ग जाहिरातीला नक्कीच बळी पडतो.

आजची तरुण पिढी आज, आत्ता, ताबडतोब या मानसिकतेत जगते आहे. ही पिढी दूरवरच्या व नजीकच्या भूतकाळाशी काहीच संबंध न ठेवणारी आहे. तशीच ती भविष्यकाळाबद्दलही आहे. दूरवरच्या भविष्यकाळाबद्दल त्यांना काहीएक देणेघेणे नाही; पण नजीकच्या भविष्यकाळातली संभाव्य सुखे वर्तमानकाळात ओढून कशी आणता येतील यासाठी प्रत्येक जण धडपडताना दिसतो आहे. जागतिकीकरणाच्या कारखान्यात गरजेच्या वस्तू बनत नाहीत, तर तिथे गरजाच बनविल्या जातात, याचे भान आलेले नाही. याला प्रसारमाध्यमांचीही जोड मिळाली आहे. कादंबरीतील मीडियाराणी हे पात्र याच सगळ्या व्यवस्थेचा एक भाग आहे. तिच्या आज्ञा सगळ्यांना पाळाव्या लागतात. कादंबरीमध्ये त्याचा संदर्भ असा येतो, 'मीडियाराणीने अचानक दिलेल्या आज्ञेमुळे सगळेजण गडबडून गेले. शॉपिंग फेस्टला सुरुवात झाली. प्रत्येकाने आपापला स्टॉल लावला. स्टॉलवर होणाऱ्या एकूण विक्रीतला ५०% भाग थेट मीडियाराणीकडे जाणार होता. कारण फेस्टची कल्पना तिची होती आणि तिच्यामुळेच या फेस्टला एक वलय प्राप्त झालं होतं.'[४] एकूणच या बाजारकेंद्री व्यवस्थेबद्दल व या कादंबरीबाबतचे थोडक्यात महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवताना विश्राम गुप्ते म्हणतात, 'जिथे वस्तू माणसांसारख्या चेतनामय होतात आणि माणसं वस्तूसारखे अचेतन, तो भोगवादी प्रदेश म्हणजे ९६ मेट्रोमॉल.''[५] अशा पद्धतीने आजच्या काळात वेगवेगळ्या व्यवस्था बाजारनियंत्रित झालेल्या असून सर्वसामान्य व्यक्तींचे वस्तूकरण करण्यात धन्यता मानत आहेत.



**मध्यमवर्ग**

मागील पंधरा-वीस वर्षांत भारतातील बाजारपेठेचे स्वरूप बदलले आहे. ग्राहकोपयोगी वस्तू आणि चैनीच्या वस्तू या बाजारपेठेची झपाट्याने वाढ होते आहे. भांडवलशाहीचा आवश्यक घटक म्हणून बाजारपेठेकडे पाहावे लागते. आज मध्यमवर्ग हा बाजारपेठेचा नायक म्हणून पुढे आला आहे. मध्यमवर्गांची संख्या झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे त्याची क्रयशक्तीही त्याच पद्धतीने वाढताना आपल्याला दिसते. मध्यमवर्गाच्या जीवनशैलीच्या कल्पनेत बदल झाल्याने समृद्धी आणि चंगळ या दोन्ही बाबींवर त्याचे वर्तन बदलताना दिसते. त्यामुळेच आकर्षक, महागड्या वस्तूंच्या बाजारपेठेला चालना मिळत आहे. याबाबत सुहास पळशीकर म्हणतात, 'संपत्ती, मालमत्ता, त्यांच्यापेक्षा उपभोगाचे वाढते प्रमाण आणि चैन ही मानके उदयाला येत आहेत. या सर्वांतून मध्यमवर्ग हा बाजारपेठेतील एक महत्त्वाचा, आग्रही कर्ता बनला आहे.'[६] गेल्या काही वर्षांत कितीतरी वेगवेगळ्या जाहिरातींनी, त्यांच्या कॅम्पेननी लोकांच्या, खरे तर मध्यमवर्गीय ग्राहकांच्या मनाचा कब्जा घेतला आहे. उदारीकरणाच्या काळात एकीकडे मध्यमवर्गाच्या पगाराचे आकडे फुगत गेले, तर दुसरीकडे त्यांचा खिसा खाली करणारी अनेक उत्पादने बाजारात आली, हा निव्वळ योगायोग नाही. या उत्पादनांच्या गुणवैशिष्ट्यांचा मारा टी. व्ही.वरून आणि इतर ठिकाणांहून होत गेला आणि मध्यमवर्गीय ग्राहकांनी त्यांचा लाभ घ्यायला सुरुवात केली. त्यामुळे मध्यमवर्गाचे 'स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग' बदलले आणि छोट्या-मोठ्या कंपन्याही बलाढ्य होत गेल्या. उत्पादनांपेक्षा आकर्षक व कल्पक जाहिरात प्रमाण मानली जाऊ लागली. तिला प्रतिसाद मिळू लागला. कादंबरीत एक स्त्री यांत्रिक आवाजात म्हणते,

*उद्या बहिणीचं लग्नय*
*सगळेच त्यात मग्नय*
*तिथे डान्स तर होणारे*
*मीही बिनधास्त नाचणारे*
*काय घालू, काय घालू, मी काय घालू ?* (पृ.२६)



Scanned by CamScanner

आणि त्याला उत्तर येते ते असे,

*खरेदी करायची तर झिपझकर डॉट इनवरच*

*मजला क्रमांक चारवर आमचं वर्चुअल शॉप.* (पृ.२७)

अशाप्रकारे जाहिरात होते. आकर्षक, चित्तवेधक आणि आवाहनात्मक असणाऱ्या या ओळींमधून ग्राहकाला वस्तू खरेदी करण्यासाठी भाग पाडले जाते.

**भाषाशैली**

कादंबरीमध्ये प्रणव सखदेव यांनी तरुणांच्या तोंडची भाषा जाणीवपूर्वक वापरल्याचे दिसून येते. आजचा तरुण ज्या पद्धतीने बोलतो, त्या भाषेचा वापर संवादामध्ये मोठ्या प्रमाणावर येतो. आजच्या तरुणांची भाषा ही वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळी असल्याचे लक्षात येते. इंग्रजी, हिंदी, मराठी या तिन्ही भाषांची सरमिसळ करून मिंग्लिश-हिंग्लिश भाषा तयार होतात. त्यामुळे 'बोला, हू विल गिव्ह मी अ फाईट ? कोण आहे तयार ?' (पृ. १८), 'असं वाटतंय की, अख्खं झाड डायमंड किंवा प्रेश्यस स्टोन्सने बदाबद भरलंय' (पृ. २१), 'मयंक, डोन्ट बी सो पॅनिक. कूल. टेक अ डीप ब्रेथ. आता आलाचं आहेस तू, केलाच आहेस स्टुपिडपणा तर बघ तरी काय होतंय ते पुढे...' (पृ. २५), अशा पद्धतीची वाक्यरचना येते. कादंबरीमध्ये संवादाची भाषा ही बोलीभाषा किंवा प्रमाणभाषा असते. लेखक त्या पात्राची गरज पाहून तशी रचना करतो. या ठिकाणी लेखक पात्राच्या संवादात तरुणाईची भाषा, इंग्रजी शब्दांचा खच, स्लँग लँग्वेज वापरतो.

**समारोप**

वास्तव आणि अतिवास्तव याचे एक अनोखे जग प्रणव सखदेव यांनी कादंबरीमध्ये निर्माण केले आहे. भविष्याच्या पाऊलखुणा वर्तमानाच्या भूमीवर अक्राळविक्राळ रूप धारण करत आहेत. तंत्रज्ञानाच्या जोरावर मानवाने खूप काही साध्य केले. या नव्या जगाचे अद्भुत चित्र या कादंबरीत आहे. पार्टी नाकारणे, मीडियाला विरोध करणे, गॅजेट्स तोडणे व मीडियाच्या खेळात भाग न घेणे असं सगळं एखाद्याच्या हातून झाले की काय होते, याचे महत्त्वपूर्ण विश्लेषण या लघुकादंबरीत पाहायला मिळते. एकूणच चंगळवादी समाजाचा समकाल चित्रित झाला आहे.

**संदर्भ**

१) प्रणव सखदेव, ९६ मेट्रोमॉल, रोहन प्रकाशन, पुणे, मार्च २०२०, पृ. १२६



२) तत्रैव, पृ. २४.

३) तत्रैव, पृ. २४.

४) तत्रैव, पृ. ११०.

५) विश्राम गुप्ते, नवं जग, नवी कादंबरी, वर्णमुद्रा पब्लिशर्स, शेगाव, २०२३, पृ. ८९.

६) राम जगताप (संपा.), मध्यमवर्ग : उभा, आडवा, तिरपा, सुहास पळशीकर, मध्यमवर्ग : भांडवलशाहीचा सांगाती.

७) राजहंस प्रकाशन, पुणे, २०१७, पृ. १७४.

**- डॉ. सुधीर बब्रुवान मोरे**

साहाय्यक प्राध्यापक (मराठी)

वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था,

नागपूर.

मोबा. : ९४२२०००६११

ईमेल : sudhirraomore@gmail.com

★ ★ ★

**इंद्रधनू**

### • तीर्थ •

तीर्थ म्हणजे पवित्र जल ! म्हणूनच तीर्थाला 'पंचामृत' म्हणतात. पंचामृत म्हणजे जीवनाला संजीवन देणारे ! यात दही, दूध, मध, साखर आणि तूप असते.

१) दूध - जगण्यातील आनंद.

२) दही - आनंदाची निर्मळ जाणीव.

३) मध - चांगल्या गोष्टींचा संचय.

४) साखर - शैशवाचा निरागस गोडवा.

५) तूप - निरपेक्ष स्नेह.

असे हे पवित्र पंचामृत पळीने देतात. पळापळाने जगण्याचे भान देणारी ही वास्तवता. तीर्थ म्हणजे नैतिक मूल्य देणारी शक्ती ! म्हणून आपण वडिलमंडळींना 'तीर्थरूप' म्हणतो.

**- उज्वला विलास कुलकर्णी**



Scanned by CamScanner

मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned by CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ८ अंक : २

पौष, माघ, फाल्गुन शके १९४३
जानेवारी, फेब्रुवारी, मार्च २०२२

---

संपादक : श्री. भीमसेनराव माड्याळकर
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ डॉ. विजया तेलंग

---

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,**
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने 'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned by CamScanner

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म'मधील भगवान बुद्धांची सौंदर्यसृष्टी / प्रो. डॉ. शशिकान्त लोखंडे ७
- १९९० नंतरच्या मराठी आत्मकथनात्मक कादंबरीतील विजिगीषू वृत्ती / प्रा. डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात २४
- आलोक : आजचे 'स्वास्थ्यहारक' समाजवास्तव / डॉ. सुधीर बब्रुवान मोरे ३३
- समकालीन ग्रामीण दलित स्त्रीवादी कथा / प्रा. डॉ. ज्ञानेश्वर सखाराम गवळीकर ४३
- धोंडी (कथा) / युवराज मेघराज पवार ४७
- स्वातंत्र्य कधी, कुणामुळे मिळाले ? (हे काय आता विचारायचे प्रश्न आहेत ?) / डॉ. विजय पांढरीपाडे ५६
- दो गज जमी / वसुंधरा दशरथराव सुत्रावे ६०
- कविता.... कविता.... कविता.... कविता.... ६५
- फ. मुं. नावाचं माणूसपण...! / माधुरी अशिरगडे ७०
- अक्षता / मीनाक्षी बक्षी ७४
- जलसाक्षरता आणि 'नवी प्रतिज्ञा' / डॉ. विलास पाटील ८२
- नवोदित गझलकारांना मार्गदर्शक आणि परिपूर्ण गझलसंग्रह - उर्मिला / प्रकाश रामचंद्र क्षीरसागर ९१
- मंडळाची वाटचाल..... ९४


Scanned by CamScanner

# आलोक : आजचे 'स्वास्थ्यहारक' समाजवास्तव

• डॉ. सुधीर बब्रुवान मोरे

## प्रास्ताविक

आसाराम लोमटे हे आघाडीचे समकालीन मराठी कथाकार आहेत, त्याचबरोबर 'लोकसत्ता' या दैनिक वर्तमानपत्राचे ते परभणी येथील वार्ताहर आहेत. त्यांचे आजवर 'इडा पिडा टळो' (२००६), 'आलोक' (२०१०) हे कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'आलोक' या कथासंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार (२०१६) प्राप्त झाला आहे. 'धूळपेर' (२०१७) हा त्यांचा लेखसंग्रह असून 'तसनस' ही त्यांची अलीकडे प्रकाशित झालेली कादंबरी आहे.

'दुष्काळ झळा : निवडणुकीच्या रंगीबेरंगी सतरंजीखाली दडवलेला कचरा' हा आसाराम लोमटे यांचा लेख २०१९ सालच्या एप्रिलमध्ये लोकसत्तेत प्रसिद्ध झाला. पुढे आसाराम लोमटे यांनी 'साधना'मध्ये दुष्काळावर ९ लेख लिहिले. हे लेख लिहिण्यापूर्वी आसाराम लोमटे ह्यांनी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांना भेटी दिल्या. जिथून मध्य प्रदेशाची हद्द दिसते, अशा वरूड तालुक्यातल्या सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या गावांपासून ते नेहमीच दुष्काळ सोसणाऱ्या माणदेशातल्या अनेक गावांपर्यंत या निमित्ताने ते फिरले. ४५-४६ अंशापर्यंत तडकलेल्या चढत्या भाजणीच्या उन्हात जगण्याचा संघर्ष करणाऱ्या व दुष्काळ सोसणाऱ्या आणि दुष्काळाशी दोन हात करणाऱ्या जनतेशी त्यांना संवाद साधता आला.

आसाराम लोमटे हे प्रत्यक्ष समाजात वावरत असल्यामुळे समाजातल्या अडीअडचणी, ताणेबाणे, वेदना, दुःख, दारिद्र्य, राजकारण या सर्वांचे अगदी जवळून निरीक्षण केलेले आहे. 'आलोक' या कथासंग्रहाचे शीर्षक याच अनुषंगाने येते. कथाकार आजूबाजूला ज्या सूक्ष्म पद्धतीने निरीक्षण करतो आहे, त्याच अनुषंगाने त्याच्या साहित्यातील आशयसुद्धा येताना दिसतो. 'आलोक'ला इंग्रजीत



Scanned by CamScanner

Perspective असे म्हणतात. यासाठी 'परीदर्शन' असाही शब्द वापरतात. दिसणारा, जाणवणारा असा एखादा भाग वर्णन करणे, चित्रित करणे हे एक आलोक किंवा परीदर्शन असते. उदा. एखाद्या समाजाचे अनेकविध बाजूंनी निरीक्षण करून, त्याचे नेमके स्वरूप चित्रित करणे हा त्या समाजाचा परीदर्शन अगर परिप्रेक्ष्य आलोक होईल. या अनुषंगाने आसाराम लोमटे यांचे कथालेखन येते.

## 'आलोक'मधील आशय

'आलोक' या कथासंग्रहात चिरेबंद, ओझं, खुंदळण, कुभांड, जीत, वळण अशा सहा कथा आहेत. आसाराम लोमटे आपल्या कथांमधून केवळ घटनाच सांगत नाहीत तर घटनेबरोबरच येणाऱ्या व्यक्तिरेखाटनाच्या माध्यमातून माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तींवर भाष्य करतात. या वृत्ती-प्रवृत्तीवर माणसांचे वर्तन अवलंबून असते.

'चिरेबंद' या कथेत हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हुतात्मा बनल्याची नोंद असलेल्या आजोबांचा सन्मान स्वीकारण्यासाठी आलेल्या नातवाला घडलेल्या आजोबांच्या कर्तृत्वाची ही सत्यकथा आहे. प्रसादच्या मनात आजी आणि आजोबा यांच्याबाबत दोन प्रतिमा आहेत. पंत हे सावकार होते, लोकांच्या जमिनी हडपल्या म्हणून त्यांचा खून झाला अशी एक, तर दुसरी रझाकारांच्या विरोधात काम करत होते, त्यांच्या विरोधात लढणाऱ्याला बळ देत होते, म्हणून त्यांची हत्या झाली ही दुसरी प्रतिमा. आजीचेही तसेच. प्रसादच्या आईच्या मते, आजी खूप हट्टी आहे, स्वतःला जे वाटतं तेच ती करते. प्रत्यक्षात मात्र प्रसादला आजी अतिशय शांत, गंभीर, विचारी अशी दिसते. या साऱ्यांचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न प्रसाद करताना दिसतो. प्रसादला स्वतःच्या आईकडून आणि गावात आल्यावर काही लोकांकडून हे सारे संदर्भाचे धागे कळू लागतात. त्याची आजी चिरेबंदी वाडा सोडत नाही, ती चिवट आहे. नवऱ्याने शोषणातून सारा जमीन जुमला मिळविला आहे, याची तिला कल्पना आहे. ही आजीसुद्धा एकाकी तरीही चिरेबंद. प्रसादला मात्र हा पिढीजात वारशाचा वाडा, जमीनजुमला या कशाशीही नाते जोडून घ्यावे असे वाटत नाही. हे सारे शोषणातून एकवटलेले आहे, ही जाणीव त्याचा सदैव पाठलाग करते. तसे तो फक्त कुठेच म्हणत नाही; पण तशी हळूहळू त्याची धारणा पक्की होत जाते. काही मोजकेच दिवस थांबल्यानंतर तो एके दिवशी या चिरेबंद वाड्यातून बाहेर पडतो. या ठिकाणी गावात एखाद्या



Scanned by CamScanner

कुटुंबाकडे एकवटलेल्या सत्ता संपत्तीच्या हव्यासातून जन्माला आलेली शोषणाची रीत चित्रित झाली आहे.

'ओझं' ही या कथासंग्रहातील एक महत्त्वाची कथा आहे. आपल्यापेक्षा सात-आठ वर्षांनी मोठ्या; पण आत्महत्या केलेल्या शेतकरी भावाशी मुरलीशी प्राध्यापक भावानं केलेला संवाद असे कथेचे स्वरूप आहे. कथेत काहीही विलक्षण घडत नाही किंवा कुठंही धक्का देणारे प्रसंग नाहीत, तरीही अगदी पहिल्यापासून ही कथा उद्ध्वस्ततेचा एक भयाण अनुभव देते. थोरला भाऊ शेती पाहतो. धाकटा कुटुंबाला लागेल तशी मदत करीत राहतो. दोघा भावांचे भावबंध अतिशय मनोज्ञ येतात.

मुरलीला मुलीची चतुराची काळजी असते. तिने खूप शिकावं अशी त्याची इच्छा; परंतु ते जमत नाही. त्यामुळे तो कमालीचा दुखावला जातो. पावसा-अभावी वाया गेलेलं बियाणं, खासगी फायनान्स कंपनीकडून घेतलेलं कर्ज, त्यातच लागलेलं दारू पिण्याचं व्यसन असं सारं कथेत येतं. कुणाही संवेदनशील माणसाची झोप उडवण्याची ताकद या कथेत आहे. इतका हलवून टाकणारा, मनाच्या तळाशी सुरुंग लावणारा अनुभव आसराम लोमटे या कथेच्या माध्यमातून देतात.

'खुंदळण' ही डाव्या चळवळीतून प्रस्थापित राजकीय प्रवाहात आलेल्या दत्तराव या कार्यकर्त्याच्या घुसमटीची कथा आहे. 'जे बी पेरणीसाठी ठेवलं ते कधीच दळून खायचं नाही हा शिरस्ता लोकांनी पाळला, नसता दुष्काळाच्या तडाख्यातून बी वाचलं असतं का ? आपणही होतो एक बियाचं कणीस. किती दिवस आले-गेले, इतक्या वाहुटळी आल्या, किती हंगाम करपले तरी आपल्याला धक्का नव्हता. शेवटी आपण जात्यातून भरडून निघालोच. पीठ झालं आपलं. आता त्याचा होणार हुर्डा आणि आपल्याला कुणीही मळत राहणार, त्याला आता इलाज नाही.'[१] ह्या सुरुवातीच्या परिच्छेदातूनच कथेचे सूचन होते.

गावात आणि तालुक्याच्या राजकारणात मुख्य राजकीय प्रवाहापासून वेगळे राहून डाव्या चळवळीत काम करताना निवडणुकीच्या राजकारणात दत्तराव यांना कधी यश येत नाही, मात्र कौटुंबिक अडचणीच्या काळात प्रस्थापितांच्या कळपाकडे ओढला जातो, ते त्याला सामावून घेऊन मुलीच्या लग्नासाठी मदतही करतात; परंतु जिथे आपली वैचारिक नाळ जोडली आहे, त्या चळवळीपासून तुटल्यामुळे दत्तरावची अवस्था मोठी कठीण होते. नव्या कळपात मन रमत नाही



Scanned by CamScanner

आणि चळवळीतले जुने लोक भेटले की टोमणे मारतात, अशा परिस्थितीत मनाचा निश्चय करून तो ज्यांच्यापासून तुटलो त्या अप्पांना भेटायला जातो. त्यावेळी ते म्हणतात, 'दुसऱ्याच्या दावणीला चाऱ्यापाण्याची सोय झाली की लगेच पळतात. काही ढोरंच इतके हावरट की खुटा उपटून पळायची तयारी. मग जगता तरी कशाला ? माणसं पोट जगविण्यासाठी उन्हातान्हाचं राबतात. थोडं पाप केलं तरी पोट भरता येतं. काय गरज दिवस-रात्र रक्त ओकायची ? पण तसं नाही, कष्टकरी माणसं दोन वेळच्या पोटभर जेवणासाठी रक्ताचं पाणी करतात. बाया दोन-दोन महिन्यांची चिल्ली-पिल्ली झोळणीत टाकून मरमर मरतात. काय गरजय त्यांना इतकं सारं करण्यासाठी ? ही माणसं खंगून मरतील; पण कोणाच्या वळचणीला जाऊन उष्ट्यावर जगणार नाहीत. जे त्यांना कळतं ते तुम्हाला कळत नाही.'[२] बदलती राजकीय संस्कृती आणि आयुष्यभर तत्त्वनिष्ठ राहून केलेले राजकारण याचं दर्शन घडवणारी ही कथा आहे. विचारनिष्ठेपासून ढळलेल्या आणि अपराधी भावनेने ग्रासलेल्या दत्ताराव या कार्यकर्त्याचे भावविश्व अतिशय ताकदीने लोमटे यांनी विशद केले आहे.

'कुभांड' या कथेत गावातल्या राजकारणातून परस्परांचा काटा काढण्यासाठी सामान्य माणसाचा वापर कसा केला जातो याचे दर्शन घडते. गावातील सरपंच आणि मालपाटील या दोघांच्या सत्ता शर्यतीतून अंगणवाडी सेविका गवळणबाईच्या आयुष्याची कशी धूळधाण होते याचे चित्रण येते. सर्वसामान्य माणूस राजकारणी लोकांसाठी अतिशय स्वस्त झाला. कुठल्या घटनेचा कोण कशा पद्धतीने फायदा उठवेल हे आजच्या घडीला सांगता येत नाही, त्यामुळे आजची गावे ही या अनुषंगाने अतिशय स्फोटक झालेली आहेत. ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, जिल्हा परिषदेच्या शाळा, तलाठी या काम करणाऱ्या लोकांना राजकीय लोकांचा कधी बळी बनवला जाईल हे सांगता येत नाही.

'जीत' या कथेत ग्रामपंचायत सदस्याच्या मृत्युनंतरच्या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने घडणाऱ्या राजकारणाचा वेध घेतला आहे. या ठिकाणी राजकारणाचा ढासळत गेलेला स्तर घटनांवरून कथेत स्पष्ट होतो. पैसा, दारू, भावनिक राजकारण या साऱ्याचा वापर करून सत्ता राखण्याचा प्रयत्न कशा पद्धतीने होतो, याचे चित्रण येते. नवऱ्याच्या अपघाती मृत्यूनंतर राजकारणात पडायचे नाही अशी म्हणणारी कौसाबाई शेवटी विरोधी पक्षाकडून अर्ज भरते आणि निवडूनही येते.



Scanned by CamScanner

'वळण' ही या कथासंग्रहातील अशीच आणखी एक महत्त्वाची कथा आहे. आसाराम लोमटे यांनी आपल्या कथांतून सातत्याने मराठवाड्यातील बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. शेळ्या घेऊन रानात जाणाऱ्या बापाची मुलगी प्रयाग. बापाची लाडकी पगन. आठव्या इयत्तेत शिकणाऱ्या प्रयाग उर्फ पगन या मुलीची ही कथा आहे. पगन शिष्यवृत्ती मिळालेली शाळेतली एकुलती एक मुलगी आहे. शिक्षणाची कमालीची ओढ आणि शिक्षणामुळंच आपलं भाग्य उजळणार आहे, याची समज आणि अंगभूत शहाणपणा तिच्याकडे आहे. वारंवार पडणारे दुष्काळ व या दुष्काळी परिस्थितीतही गरीब कुटुंबातील प्रयाग शिक्षणासाठी धडपडते आहे, तिला यामध्ये अनेक अडचणी येतात; पण त्यावरती मात करत शिकू इच्छिते. ती आपल्या वडिलांना म्हणते, 'दादा मला शिकायचंय ! ह्यो रानचा कोंडवाडा नगं मला.'[३] यामधून तिच्या मनातील शिक्षणाविषयीचा प्रबळ आत्मविश्वास दिसून येतो. आज ग्रामीण जीवनात जी उदासीनता दिसून येते, त्याचा परिणाम म्हणून मुलं-मुली शिक्षणाकडे झपाट्याने वळले आहेत. त्यांना शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय दिसत नाही. त्यातूनच ती त्याच्यासाठी धडपडत आहेत. आजचे शेतीचे वास्तव हे त्यांना लक्षात आल्यामुळे ती या व्यवस्थेकडे या दृष्टीने पाहते.

शेजारच्या गावात शाळेसाठी येणारी प्रयाग एकेदिवशी शाळेच्या वाटेवर घडलेल्या एका खुनाची साक्षीदार बनते आणि तिच्यासह तिच्या कुटुंबाचेही स्वास्थ्य हरवून जाते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शिकणाऱ्या प्रयागच्या मार्गात अडथळे येतात आणि या साऱ्या भानगडीत तिची शाळाच बंद होण्याची पाळी येते. तिची शाळा सुरू राहण्यासाठी तिच्या अडाणी वडिलांनी केलेले शर्थीचे प्रयत्न, शिक्षकांनी केलेली मदत या साऱ्याचे चित्रण कमालीचा अस्वस्थ अनुभव देते.

आजचा काळ आणि भवताल यांमधील आशय घेऊन आसाराम लोमटे आपल्या कथांना आकार देताना दिसतात. समाजातील वास्तव अतिशय सूक्ष्मपणे हेरण्याची दृष्टी यांच्याकडे आहे, त्यामुळे कथांमधील व्यक्तिरेखा, त्यांचे जगणे हे सगळे अतिशय प्रत्ययकारीपणे आपल्यासमोर आशयाच्या रूपाने येताना दिसते.

**'आलोक'ची भाषाशैली**

आसाराम लोमटे यांच्या कथेची भाषाशैली ही अतिशय महत्त्वाची आहे. त्यांनी कथेसाठी विचारपूर्वक शैली निवडलेली आपल्याला दिसून येते. ते त्यांच्या



Scanned by CamScanner

भाषेबाबत म्हणतात, 'या पुस्तकातल्या कथांसाठी मी भाषेवर जास्त मेहनत घेतलेली आहे. पूर्णपणे ग्रामीण ढंगाची भाषा मी कधीच वापरत नाही. मी माझ्या वकुबाप्रमाणे भाषेची बऱ्यापैकी मोडतोड करण्याचा प्रयत्न करतो. 'आम्हाला तुमची भाषा समजत नाही', असे सांगणारे वाचक भेटत असल्याचा काही लेखकांना बऱ्याचदा अनुभव येतो. विशेषतः महानगरातल्या वाचकांची ही तक्रार असते. मला मात्र असा अनुभव नाही.'[४] याठिकाणी कथाकाराला जे म्हणायचं आहे ते वाचकांपर्यंत व्यवस्थितरीत्या पोहोचण्यासाठी भाषा हेच मुख्य माध्यम आहे आणि या माध्यमाचा खुबीने वापर केला तर त्याची परिणामकारकता जास्त असते. त्याच्यामुळे कथा ही वाचनीय होते. या संदर्भात ते म्हणतात, 'मी त्या भाषेतली वाचनीयता टिकवण्याचा प्रयत्न करतो. तसंच त्या सगळ्या परिसराचं वळण त्या भाषेला देण्याचा; पण नागर व ग्रामीण या दोन्ही भाषांची मोडतोड करून ती भाषा माझ्या पद्धतीने घडवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे माझी भाषा दुर्बोध असल्याचं, अनाकलनीय असल्याचं, समजत नसल्याचं सांगणारं मला कोणी भेटत नाही.'[५] यावरून कथाकाराचे भाषाशैलीच्या संदर्भातील असणारे महत्त्व विशद होते.

**चित्रमयता**

आसाराम लोमटे यांच्या भाषाशैलीचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या भाषेतून येणारी चित्रमयता. लोमटे कथेतील प्रसंग आपल्यासमोर प्रत्यक्ष उभा करतात. उदाहरणार्थ, 'चिरेबंद' या कथेतील पुढील वर्णन. 'समोरून एक भली मोठी दांडगी बाई येताना दिसली. आजवर इतकी दांडगी बाई मी पाहिली नव्हती, वय बरंच, कपाळ पांढरं फटफटीत म्हणजे विधवा असावी. आता उतारवयाकडे लागलेली; पण चालण्यातला जोम भलताच. तिने आजीला पाहिलं अन् थांबली. आजीही थबकली. घसा खाकरून ती बाई मोठ्याने थुंकली. पायातल्या चपलेनं जमीन रगडली अन् काहीतरी वाईटसाईट बोलून निघून गेली'[६] या ठिकाणी हा प्रसंग आपल्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष उभा राहतो. ही ताकद आसाराम लोमटे यांच्या भाषेत आहे, हे जाणवते.

**प्रतिमासृष्टी**

'आलोक'मधील प्रतिमासृष्टी हा एक स्वतंत्र निबंधाचा विषय होऊ शकतो, इतक्या विपुल प्रतिमा या कथासंग्रहात आलेल्या दिसून येतात. प्रतिमा म्हणजे चित्र, मूर्ती किंवा प्रतिबिंब होय. आपण जेव्हा एखादी वस्तू पाहतो तेव्हा



Scanned by CamScanner

आपल्याला त्याचे इंद्रीयगोचर स्वरूप जाणवते; परंतु ती वस्तू डोळ्यांसमोर नसताना आपण तिच्या रंगरूपाचे चित्र मनःचक्षुसमोर आणू शकतो. आपल्या मनःचक्षुसमोर येणाऱ्या या चित्राला मनोविज्ञानामध्ये प्रतिमा म्हणतात. विसदृश्य कल्पनांचा संयोग घडवून आणणे, भावनिक व्यामिश्रतेची यथार्थ अभिव्यक्ती करणे ही प्रतिमांची वैशिष्ट्ये ठरतात. या अनुषंगाने आसाराम लोमटे यांनी प्रतिमासृष्टी या ठिकाणी निर्माण केलेली आहे, ती अतिशय महत्त्वाची आहे. ही प्रतिमासृष्टी इंद्रियसंवेदनात्मक अनुभूतीची प्रतिती कशी देते यासाठी काही उदाहरणे आपल्या समोर ठेवतो.

'चिरेबंद' या कथेतील पुढील उदाहरण -

- पाऊस सारखा छपराची माती गळत असल्यासारखा भुरुभुरु गळतोय. (पृ.१०)
- कंदिलाची वात आळोखे पिळोखे देत जळते आहे. (पृ.१२)
- कुणीतरी ढकलून दिल्यागत मी दरवाजाबाहेर पाऊल टाकलं आणि पांढरा नंदी पाठीमागं लागल्यासारखा वेगानं पायऱ्या उतरत खाली आलो. (पृ.३१)

या शब्दांत कथा संपते. या ठिकाणी आलेली पांढऱ्या नंदीची प्रतिमा ही अघोरी संपत्तीचे सूचन करते.

'ओझं' या कथेतील

- गाडी ओढणाऱ्या बैलानं शिवळा-जोत्यातून मान काढून भर रस्त्यात गाडी सोडून जावं तसं तुझं निघून जाणं झालं. (पृ. ३३)
- तू गेलास आणि वहिनीच्या उभ्या जन्माचा उन्हाळा केलास. (पृ. ३३)

'खुंदळण' या कथेतील

- अश्या टिचऱ्या गोट्या आमच्या डावात नगं. (पृ. ५७)

या ठिकाणी दत्तारावचा मुलगा संजू बाहेर मुलांमध्ये खेळत असताना लिंबाजीचा मुलगा संतु आमच्या बरोबर खेळू नको हे सांगत असताना वरील विधान करतो. 'टिचरी गोटी' ही जी प्रतिमा आहे ती या ठिकाणी दत्तारावचे प्रस्थापित पक्षातील पक्षांतर करण्याच्या निर्णयावर केलेले हे भाष्य आहे. कार्यकर्त्याचे टिचलेपण त्यातून उठावदारपणे येते.

- आता कात टाकल्यावनी लागा बरं कामाला अन् इकडे तिकडे हिंडताना, गावात फिरताना आमच्यासंग राहत जा बर. असं पान्हा चोरनं बस झालं आता. (पृ. ५९)

या ठिकाणी दत्ताराव जरी प्रस्थापित पक्षात गेले असले तरी त्या ठिकाणी त्यांना

काम करत असताना म्हणावे तितके सहजपण आलेलं नाही. या ठिकाणी जी प्रतिमा निर्माण केली आहे ती जनावर दूध देत असताना ज्या पद्धतीने नवीन माणूस त्या ठिकाणी आला तर ते पान्हा आटवते किंवा चोरते. या ठिकाणीही अशाच पद्धतीचे वर्णन करून दत्तारावची मानसिकता स्पष्ट होते. वरील सर्व प्रतिमांमधून इंद्रियसंवेदनात्मक अनुभूतीची प्रतिती येते.

## सूचकता

आसाराम लोमटे त्यांच्या कथांमध्ये अनेकदा आशयाच्या अनुषंगाने सूचकता दाखवतात आणि ही सूचकता प्रसंगानुरूप त्या ठिकाणी वाचकांना विचार करायला लावते.

'चिरेबंद' या कथेतील प्रसाद हा आपल्या मूळगावी गेलेला असताना शेतात जातो. त्यावेळी रस्त्यात भेटलेल्या एक व्यक्तीला गडी ओळख करून देताना, 'हे पंतांचे नातू' अशी ओळख करून देतो. त्यावेळी ती व्यक्ती प्रसादकडे पाहून म्हणते, 'कशाला येतोस बाबा इकडं नुसता फुपाटाय... सगळ्या आयुष्याची पायपोळ व्हायची. जमिनीची तहान पंतालाही होती; पण जिवापेक्षा भारी असून काय कामाची ? त्यात पुन्हा तुमच्या जमिनी तशा. काटकिंजाळ केकताडात कशाला घालायचा हात ?'[७]

या ठिकाणी पंतांची जमिनीची हाव किंवा भूक सूचित होते. त्याचबरोबर पंताचा मृत्यू सुद्धा या जमिनीच्या वादातून झाल्याचे सूचन करते आणि भविष्यातही या जमिनीची अपेक्षा ठेवणे म्हणजे स्वतःचे मरण ओढवून घेण्यासारखं आहे, अशा पद्धतीचं सूचन या ठिकाणी होताना दिसते. या ठिकाणी जी प्रतिमा निर्माण केली आहे ती महत्त्वाची आहे, 'काटकिंजाळ केकताडात' ही जी प्रतिमा आहे याठिकाणी केकताडात मोठ्या प्रमाणावर साप वास्तव्याला असतात हे सूचन या ठिकाणी महत्त्वाचे होते

असेच आणखी एक 'चिरेबंद' मधील उदा. प्रसाद हा शेतातील गड्याशी चर्चा करत असताना वादातील जमिनी ताब्यात घेण्यासंदर्भात व त्या नांगरण्याबाबत बोलतो. त्यावेळी तो गडी म्हणतो, 'मालक आता ह्या जमिनीमध्ये औत घालायचं म्हणजे वारूळातच हात घातल्यावानी हाय.'[८] या ठिकाणी हे सूचन आपल्याला लक्षात येते.

## निवेदनशैली

आसाराम लोमटे यांच्या कथेतील निवेदनशैलीचा विचारही महत्त्वाचा



Scanned by CamScanner

ठरतो. कादंबरीप्रमाणे कथेतल्या निवेदकाला निवेदनातून वातावरण निर्मिती करण्यासाठी मोठा अवकाश उपलब्ध नसतो, कमी अवकाशात त्याला वातावरण निर्मिती करावयाची असते. इथे पाल्हाळीकतेला जास्त वाव नसतो, त्यामुळे निवेदनशैली महत्त्वाची ठरते आणि त्या अनुषंगाने आसाराम लोमटे यांच्या कथेतील निवेदनशैली ही अतिशय प्रभावी परिणामकारक ठरताना दिसते.

**समारोप**

एकूणच आसाराम लोमटे वेगळ्या वाटेने जाऊन माणसांच्या मनाचा तळ गाठण्याचा प्रयत्न करतात आणि तो गाठता गाठता वाचकाच्या मनाचा तळ हलवून टाकतात. माणसांच्या जगण्याविषयी, नातेसंबंधांविषयी, त्याच्या संघर्षाविषयी कमालीच्या आस्थेनं आणि आत्मियतेनं ते लिहिताना दिसतात. त्यांच्या कथा ह्या माणसाच्या अंतःकरणापर्यंत जाऊन संवेदनशील वाचकाच्या मनात काही प्रश्न उपस्थित करतात, त्यांना अस्वस्थ करतात. ते आपल्या लेखनामागील भूमिका विशद करताना म्हणतात, 'बाजारात भलेही 'स्वास्थ्यकारक' जगण्याची उत्पादने भरमसाठ असतील; पण लेखकाने मात्र 'स्वास्थ्यहारक'च लिहावे. वाचून प्रश्न पडावा, झोप उडावी, अगणित भुंग्यांचे मोहोळ उठावे आणि त्याने वाचणारालाही दंश करावा असे लिहिण्यासाठी मी धडपडतो आहे.' अशा पद्धतीने भवतालात जाणवणाऱ्या वास्तवाला कवेत घेऊन त्याला कथात्मक रूप देऊन वाचकांना अस्वस्थतेचा अनुभव आसाराम लोमटे त्यांच्या कथांच्या माध्यमातून देतात.

**संदर्भ**


१) आसाराम लोमटे, आलोक, शब्द पब्लिकेशन, चौथी आवृत्ती, डिसेंबर २०१७, पृ. ५५.
२) तत्रैव, पृ. ७७, ७८.
३) तत्रैव, पृ. १५३.
४) मुक्त शब्द, जानेवारी २०१७, पृ. १२.
५) तत्रैव, पृ. १३.
६) आसाराम लोमटे, उनि, पृ. ११.
७) तत्रैव, पृ. ११.
८) तत्रैव, पृ. २२.





Scanned by CamScanner

१) मुक्त शब्द, मार्च २०१७, पृ. ६१.

- डॉ. सुधीर बब्रुवान मोरे,
साहाय्यक प्राध्यापक (मराठी),
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.
मोबा. : ९४२२०००६११

★ ★ ★


## फॉर्म ४ (नियम ८) अन्वये निवेदन

१. प्रकाशनाचे नाव : भाव अनुबंध
२. प्रकाशनाचे स्थळ : गुलबर्गा (कर्नाटक)
३. प्रकाशनाचा काळ : त्रैमासिक
४. प्रकाशनाची भाषा : मराठी
५. संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
६. नागरिकत्व : भारतीय
७. मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता :
श्री. भीमसेनराव माड्याळकर, अध्यक्ष
मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा ५८५१०२. (कर्नाटक)

८. नागरिकत्व : भारतीय

९. मुद्रणस्थळ : साई समर्थ प्रिंटर्स
दुकान क्र. ४ विठ्ठल हाईटस्, हिंगणे (खुर्द), पुणे ५१.

१०. मालकाचे नाव व पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा ५८५१०२. (कर्नाटक)

मी, सर्वोत्तम सताळकर जाहीर करतो, की वरील सर्व तपशील माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे खरा आहे.

गुलबर्गा
दि. २८-२-२०२२

सही/-
सर्वोत्तम सताळकर




Scanned by CamScanner

## Journal Details

| | |
|---|---|
| **Journal Title (in English Language)** | Bhav Anubhandh (print only) \| (Current Table of Content) |
| **Journal Title (in Regional Language)** | भाव अनुबंध (print only) |
| **Publication Language** | Marathi |
| **Publisher** | Marathi Sahitya Mandal |
| **ISSN** | NA |
| **E-ISSN** | NA |
| **Discipline** | Arts and Humanities |
| **Subject** | Arts and Humanities (all) |
| **Focus Subject** | Literature and Literary Theory |

**Copyright © 2022 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer**

मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned by CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

अंक : ४
वर्ष : ८

आषाढ, श्रावण, भाद्रपद शके १९४४
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२२

---

मानद संपादक : श्री. पवनकुमार देशपांडे
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ

श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ सौ. शीतल देऊळगावकर
डॉ. योगेश्वर देशपांडे

---

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.

दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned by CamScanner

# अंतरंग.....

☛ संपादकीय..... ३
☛ काळेकरडे स्ट्रोक्स : एक उदास पोकळी / डॉ. सुधीर ब. मोरे ६
☛ गुजराती दलित कथाकार प्रवीण गढवी यांच्या कथेतील जीवन संघर्ष / अमोल सुभाष कवडे १५
☛ कृष्णात खोतांची कादंबरी / डॉ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग २१
☛ राहीच्या स्वप्नांचा उलगडा / डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ४०
☛ दोष ना कुणाचा ! (कथा) / राधिका शाम घोगले ४६
☛ संत कान्होपात्रा : जीवन चरित्र / गौरी सकुंडे ५२
☛ श्री चारधाम यात्रा/ अनुप्रिता सताळकर ५९
☛ म. फुले यांच्या काव्यातील शैक्षणिक विचार / दत्ता सरगर ६८
☛ युगान्त - एक अलौकिक पुस्तक / हरी अग्निहोत्री ७४
☛ कविता.... कविता.... कविता.... कविता.... ७६
☛ 'चित्रब्रम्ह' पुटण्णा कणगल / सर्वोत्तम सताळकर ७९
☛ कैलास लेण्यातील कथापर शिल्पपट / डॉ. चैतन्य शिनखेडे ८६
☛ मंडळाची वाटचाल..... ९४

Scanned by CamScanner

# काळेकरडे स्ट्रोक्स : एक उदास पोकळी

• डॉ. सुधीर ब. मोरे

मराठीतल्या आजच्या महत्त्वाच्या तरुण लेखकांमध्ये प्रणव सखदेव यांना गणले जाते. प्रणव सखदेव यांनी कविता, कथा आणि कादंबरी हे तीनही सर्जनशील साहित्यप्रकार हाताळले आहेत. विविध दैनिकांच्या पुरवण्या, दिवाळी अंक आणि नियतकालिकांमधून त्यांच्या कथा-कविता सातत्याने प्रकाशित होतात. 'काळेकरडे स्ट्रोक्स' (२०१८), '९६ मेट्रोमॉल' (२०२०) ह्या त्यांच्या कादंबऱ्या, 'निळ्या दाताची दंतकथा', 'नाभीतून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य' हे दोन कथासंग्रह आहेत, तर 'पायऱ्यांचा गेम आणि इतर कविता' हा त्यांचा कवितासंग्रह आहे. प्रणव सखदेव यांना त्यांच्या लेखनासाठी विविध पुरस्कार मिळाले आहेत; त्याचबरोबर कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्यातर्फे दिली जाणारी २०१५-१६ सालासाठीची अभ्यासवृत्तीही प्राप्त झालेली आहे. 'काळेकरडे स्ट्रोक्स' या कादंबरीला २०२१चा साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. तरुण पिढीची भाषा बोलणारा एक लेखक म्हणून त्यांच्या साहित्याकडे पाहावे लागते.

'काळेकरडे स्ट्रोक्स' ही प्रणव सखदेव यांची २०१८ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. उदासी, मानसिक रिकामेपण आणि मी कोण पेक्षा मी काय आहे ? याचा शोध घेणारी ही प्रेमकथा आहे. दहा वर्षांपूर्वीच्या आठवणी समीरच्या सांगण्याने ह्या कादंबरीची सुरुवात होते आणि फ्लॅशबॅक तंत्राने कादंबरी मागे जाते. शेवटी कादंबरी संपत असताना कथानक पुन्हा एकदा वर्तमानात येते.

**कथानक**

समीर या कादंबरीचा नायक आहे, चारचौघांसारखे आयुष्य जगणाऱ्या त्याच्या आई-बाबांना तो डॉक्टर किंवा सॉफ्टवेअर इंजिनियर व्हावं असे वाटत असते; मात्र समीर मास कम्युनिकेशन करण्यासाठी कला शाखा निवडतो. त्याची क्रिएटिव्हिटी ही फिल्म तयार करणे आणि पोटापाण्याचा प्रश्न म्हणून इलेक्ट्रॉनिक



मीडिया किंवा जाहिरात क्षेत्रामध्ये नोकरी करून रोजचे प्रश्न सोडवणे हा आहे. फिल्म ही त्याची पॅशन आहे. त्यासाठी राहिलेला वेळ देणे हा त्याचा उद्देश असतो. आई-बाबा मात्र या क्षेत्रनिवडीवरून रागावतात. समीरचे कौटुंबिक नातेसंबंध हे तसे वरवरचेच निर्माण झालेले होते. आई-बाबा आणि समीर यांच्या नात्यात एक गुंता तयार झालेला आहे आणि तो शेवटपर्यंत तसाच राहतो, तो कोणालाच सोडवता आलेला नाही. त्यामुळे समीर घरी केवळ झोपायला आणि जेवायला एवढ्यासाठीच जात होता. त्याचे जिव्हाळ्याचे संबंध हे बाहेरील मित्र-मैत्रिणी यांच्यामधून तो मिळवत असताना आपल्याला दिसून येतो.

समीर बाराव्वीपासूनच कोणत्याही ग्रुपमध्ये नाही. रूईया कॉलेजमध्ये अंध विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी एक ब्लाइंड सेल आहे, तिथे तो जातो. त्या ठिकाणी सानिका आणि चैतन्य यांच्याबरोबर त्याची घनिष्ठ मैत्री होते. चैतन्य हा अंध विद्यार्थी असला तरी जीवनाचे तत्त्वज्ञान त्याला चांगले समजले आहे. चैतन्य कॉलेजात एक फोन बूथही चालवत असतो. या बूथमध्ये बसून सानिका, चैतन्य आणि समीर विविध विषयांवर चर्चा करतात, गाणी म्हणतात, एकत्र चित्रपट पाहायलाही जातात. या तिघांचे ट्युनिंग चांगले जमलेले असते. चैतन्य आणि सानिका हे दोघं समीरच्या आयुष्यातील एक अविभाज्य भाग होते. समीर त्या दोघांना कधीच विसरू शकत नाही. सानिका आणि चैतन्य हे दोघं एकमेकांच्या प्रेमात असतात. पुढे चैतन्यचा अपघाती मृत्यू होतो आणि सानिका उद्ध्वस्त होते. या दोघांच्या आयुष्याचा परिणाम समीरच्या मनात उदास पोकळी निर्माण होण्यात होतो. समीरच्या आयुष्यात ज्या ज्या ठिकाणी ही पोकळी निर्माण झालेली आहे, त्यांच्या पाठीमागे काही घटना, प्रसंग हे असल्याचे आपल्याला दिसून येते.

सानिका आणि समीर यांच्या नात्यात सुरुवातीपासूनच एक निखळ मैत्री असते, मात्र चैतन्यच्या अपघाती मृत्यूने सानिका ढासळते. तिला सावरत असताना समीर तिच्या जवळ जातो, तिला सावरू पाहतो. सानिकाला तिच्या आईच्या मृत्यूबद्दलचे सत्य समजल्यानंतर ती कोलमडते. त्यावेळी समीरला तिच्या घरी बोलावते. यावेळी समीर आणि सानिका मैत्रीचे सर्व बंध तोडून शारीरिकदृष्ट्या एक होतात; पण सानिका शेवटी चैतन्यचे नाव घेते आणि समीरला या ठिकाणी धक्का बसतो. ती इतके दिवस होऊनही चैतन्यला विसरलेली नाही किंवा तिने समीरला मनाने जवळ केलेले नाही, याचा परिणाम समीरवर होतो. सानिकाच्या



Scanned by CamScanner

घरी घडलेल्या प्रसंगानंतर समीरची अवस्था वाईट होते. त्याला अपराधी वाटू लागते. त्यातून त्याच्या मनात एक उदास पोकळी भरून येते.

सानिका समीरच्या आयुष्यातून निघून जाते. तिचा कसलाही संपर्क होत नाही. त्यावेळी समीरच्या मनात उदास पोकळी निर्माण होते. त्याला वाटतं, आपल्या आयुष्यातून सानिका आता कायमची निघून गेली आहे. त्यावेळी तो म्हणतो, 'सावरीच्या शेंगेत कशा कापसाला लागलेल्या बिया असतात, तसे आम्ही होतो. एक दिवस शेंग फुटते आणि एवढे दिवस एकमेकांच्या सोबत असलेल्या म्हाताऱ्या वाऱ्यावर दूरवर विखरून जातात, पुन्हा कधीही न भेटण्यासाठी, तसंच आमचं झालंय.'[१] यात सानिका आणि समीरचे विखुरलेपण चित्रित होते, तर समीर आणि सलोनी यांच्यामध्ये काही भेटीनंतर समीरला असं वाटतं की, ते कितीतरी दिवसांपासून एकमेकांना ओळखत आहेत. त्यावेळी तो म्हणतो, 'आमच्यात काहीतरी जुळून आलंय नकळतपणे. कुठूनतरी कसल्यातरी बिया वाऱ्यावरून रिकाम्या कुंडीत पडाव्यात आणि थोड्याच दिवसांत त्यांतून रोपं तयार यावीत तसं ?'[२] या ठिकाणी सानिकाचे निघून जाणे किंवा सलोनी समीरच्या आयुष्यात येणे या दोन्ही घटनांच्या वेळी हातातून निसटणं आणि पुन्हा नव्याने काहीतरी सापडणे या अनुषंगाने हा घटना कादंबरीकार चित्रित करताना दिसतात.

पुढे समीर सलोनीच्या प्रेमात पडतो. समीरला दारू, सिगारेट, गांजा या सर्वांचे व्यसन लागलेले असते. ज्यावेळी त्याच्या मनात उदास पोकळी भरून येते, त्यावेळेस तो या व्यसनांच्या आहारी जाताना दिसतो. सलोनीच्या सहवासात आल्यानंतर त्याला एक चांगला आधार, सोबती मिळतो; मात्र तीही थोड्याच दिवसांसाठी. सानिका ही मुळशी या ठिकाणी असते. तिचा पत्ता समीरला मिळतो. तो त्या ठिकाणी तिला भेटायला जातो. तिला भेटल्यानंतर तिची मानसिक अवस्था बिकट असल्याचे त्याच्या लक्षात येते. चैतन्यचा मृत्यू, समीरशी घडलेला प्रसंग, आईच्या मृत्यूचे सत्य या साऱ्याचा परिणाम तिच्यावर झालेला असतो. याच परिणामातून ती मुळशीच्या तळ्यामध्ये आत्महत्या करते. या घटनेतून समीर ढासळतो. एका सनकीमध्ये तो सलोनीला लेक्चरमधून बाहेर ओढून आणतो आणि जेन्ट्स टॉयलेटमध्ये तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न करतो. या घटनेमुळे समीरला कॉलेजमधून काढले जाते. वर्तमानपत्रांमध्ये तशा बातम्या येतात. सलोनी समीरला सोडून न्यूझीलंडला निघून जाते. समीर उद्ध्वस्त मानसिकतेत हिमाचल प्रदेशला जातो. परत माघारी येतो. या ठिकाणी त्याला आपल्याकडून झालेल्या चुका लक्षात येतात. त्याचा मित्र दादू हा त्याला बाहेर पडण्यासाठी मदत करतो. पुढे तो कष्ट करून चांगला दिग्दर्शक होतो. त्याची एक डॉक्युमेंटरी 'औदुंबर' या नावाने येते. ती प्रेक्षकांच्या पसंतीस उतरते. समीरच्या जवळ असलेल्या ज्या व्यक्ती आहेत, त्यामध्ये सानिका, सलोनी, अरुण, दादू या सर्वांची स्वतःची एक स्वतंत्र कहाणी आहे. त्यातूनच ही कादंबरी पुढे जात राहते.

**नव्वदोत्तर काळ**

या कादंबरीचे कथानक २००० सालच्या पहिल्या दशकातील असल्याचे आपल्याला दिसून येते. अर्थव्यवस्थेत झालेल्या मूलगामी बदलांमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत परिवर्तन घडून आलेले आहे. झालेले हे बदल फक्त जगाच्या भौतिक पातळीवरचे नाहीत, तर मानवी नातेसंबंध, त्यांचे भावनिकत्व, भाषा, समाजातील मूल्यव्यवस्था इतक्या खोलवर हे बदल झालेले आहेत. हा काळ बाजारकेंद्री आहे. त्यामुळे माणसाचे ग्राहकात रूपांतर झालेले आहे. त्यांच्या माणूसपणापेक्षा त्यांचे ग्राहकत्व महत्त्वाचे मानले जात आहे. जागतिकीकरणाच्या सांस्कृतिक आक्रमणाने पूर्वापार चालत आलेले आपले संचित नष्ट केले जात आहे. अमेरिकेचा साम्राज्यवाद, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व, वाढते संगणकीकरण आणि संपर्क माध्यमांचे अतिक्रमण, माहिती-तंत्रज्ञानाचा विस्फोट, धर्मांध ध्रुवीकरण, दहशतवाद, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती आर्थिक विषमता आणि बेरोजगारी, लोकचळवळीचा होणारा ऱ्हास, इंग्रजीचा जागतिक भाषा म्हणून झालेला उदय व जगभरातील नष्ट होत असलेल्या बोलीभाषा, पर्यावरणाचा विनाश या साऱ्यांमुळे नव्वदोत्तर कालखंड काळवंडून गेल्याचे दिसते. या काळातील पिढीची मानसिकता, त्यांचे जगणे, त्यांचे विचार, त्यांची मते, समाजातील त्यांचे वागणे, घरातील नातेसंबंध, त्याचबरोबर समाजात मित्रमैत्रिणींशी असणारे नातेसंबंध हे सर्व या कादंबरीमधून प्रणव सखदेव यांनी मांडलेले आहे.

नुकतेच मोबाईल सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचत होते. अरुण समीरला एका पडक्या इमारतीमध्ये नेतो. या ठिकाणी ते चोर बाजारातील एक मोबाईल खरेदी करतात. समीर यावेळी त्याला वॉरंटीबद्दल विचारतो. तेव्हा अरुण म्हणतो, ''मधे ते हैदराबादला लुंबिनी पार्कमध्ये बॉम्बस्फोट झाले ना, कितीतरी असेच फोन्स पडले होते तिथे. तो सगळा माल चोरून इथे आलाय. यावर कसली आलीय

वॉरंटीबिरंटी ? इथे जिंदगीचा ना ठिकाणा !'[३] हजारो नागरिक या धर्मांधतेत बळी गेले. बॉम्बस्फोट हे धर्मांधतेचे अतिशय क्रूर टोक असल्याचे आपल्याला दिसून येते.

आजच्या तरुणाईचे विश्लेषण करणे कठीण आहे. कारण या पिढीमध्ये अनेक बदल स्वीकारून पुढे जाणे, त्यासाठी लागेल ते कष्ट करणे ही बाजू दिसते, तर दुसरीकडे आज, आत्ता, ताबडतोब गोष्टी मिळविण्यात ही पिढी पुढे धावताना दिसते. चैतन्य आजच्या पिढीबद्दल बोलताना समीरला म्हणतो, ''तू ना, आहेस हुशार; पण तुला काही करायला नको. आळशी आहेस नुसता. हा तुझा नाही, तर तुमच्या सगळ्या पिढीचाच प्रॉब्लेम आहे.''[४] आजच्या पिढीला वेगळे काहीतरी करायचे आहे; मात्र त्यासाठी लागणारे कष्ट, सातत्य नको आहेत. विचार केला आणि लगेच तो पूर्ण झाला असे होत नाही, त्यासाठी कष्ट करावे लागतात. त्यामुळेच चैतन्य आजच्या पिढीवर वरील भाष्य करतो. तर दुसरीकडे सानिकाचे वडील सानिकावर रागवून म्हणतात, ''या पिढीला कष्टबिष्ट करणे काही माहितीच नाहीये. सगळं सरळ मिळतंय हाता-तोंडाशी मग कांय ? नाहीतर आपण कुठे कुठे जायचो बिजनेस मिळवायला, कसेही राहायचो, काहीही खायचो, प्यायचो.''[५] नव्वदोत्तर काळातील पिढीवर आळशीपणाचे, मुबलकतेचे आरोप होतात; मात्र दुसरीकडे हीच पिढी स्वतःच्या हिमतीवरती, धाडसाने काही करू पाहते, मळवाटेने न जाता स्वतःची वाट निर्माण करण्याचाही प्रयत्न हीच पिढी करताना आपणास दिसून येते.

### लैंगिकता

कादंबरीत लैंगिक विषय मोकळेपणाने मांडला आहे. अरुण हा अतिशय बोल्ड विचारांचा समीरचा मित्र आहे. तो पोरी पटविण्यात व त्यांच्याशी शरीरसंबंध स्थापन करण्यात अतिशय पटाईत आहे. याबाबत कादंबरीमध्ये जे चित्रण आलेले आहे ते अतिशय मोकळेपणाने प्रणव सखदेव यांनी मांडलेले आहे. अरुण त्याच्या खोलीवरती कॉलगर्ल, वेश्या किंवा मैत्रिणी घेऊन येत असतो. तेथेच समीरसुद्धा असतो; मात्र त्याला कुठलीही लाज याबाबत वाटत नाही. त्याच्या वागण्यामध्ये एक प्रकारचा मुक्तपणा असल्याचे दिसून येते. कादंबरीकारसुद्धा हे प्रसंग चित्रित करत असताना अतिशय संयतपणे, कुठलाही बटबटीतपणा न येऊ देता करताना दिसतो. अरुण आणि त्याची वहिनी या दोघांमधील प्रसंग अतिशय भावनिक आहे. शरीरसंबंधात सरावलेला अरुण वहिनीच्या विनंतीसमोर मात्र हतबल होतो, उदास होतो. त्यावेळी त्याला काहीही सुचत नाही. त्याच्या मनामध्ये एक अपराधी भावना निर्माण होते.

समीर वेगवेगळ्या मुलींच्या संपर्कात येतो. ज्यामध्ये सानिका, सलोनी, अरुणची मैत्रीण चिंकी यांचा उल्लेख करता येतो. या सर्वांच्या घटनांमध्ये शरीरसंबंधाची वर्णने येतात; मात्र ही येत असताना कादंबरीकार वातावरणनिर्मिती, त्या आशयाची गरज, पात्राची मानसिकता या साऱ्यांचा विचार करून वर्णन त्या ठिकाणी येताना दिसते. येथे केवळ सणसणाटी काही देणे इतकाच त्यामागचा उद्देश असल्याचे दिसत नाही.

### व्यक्तिरेखा

'काळेकरडे स्ट्रोक्स' या कादंबरीमध्ये मोजकीच पात्रे असल्याचे आपल्याला दिसून येते. यामध्ये अरुण, सानिका, सलोनी आणि दादूकाका या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा होत. या सर्वांची स्वतंत्र अशी कहाणी आहे.

अरुण हा समीरपेक्षा वयाने मोठा आहे. तो या कॉलेजचा विद्यार्थी नाही; पण समीर आणि त्याच्यात साहित्यप्रेमामुळे मैत्री होते. अरुणची परळमध्ये भाड्याने घेतलेली खोली आहे. तिथे तो एकटाच राहत असतो. अरुणशी मैत्री झाल्यावर समीरही ह्या खोलीवर जाऊ लागतो. अरुणच्या संगतीने त्याला दारू, गांजा, अफूची सवय लागते. अरुण तिथे पैसे देऊन मुलींना आणत असतो. एकूणच अनियंत्रित असे त्याचे वागणे असल्याचे दिसते. मात्र जीवनाबद्दलची त्याची समज चांगली असल्याचे दिसते. वहिनीला मूल होत नाही, अरुणचा दादा त्यासाठी सक्षम नसतो; मात्र वहिनीची विनंती व तिची परिस्थिती लक्षात घेऊन तो त्यासाठी तयार होतो. एक 'गिल्टी' भावना सोबत ठेवूनच तो पुढे जगतो.

सलोनी ही रूईया कॉलेजमध्येच शिकणारी वाणिज्यची विद्यार्थिनी आहे. समीर व सलोनीची ओळख होते आणि ते एकमेकांकडे आकर्षिले जातात. सलोनी एक स्वतंत्र विचाराची समजूतदार अशी मुलगी आहे. तिला हा दुर्धर आजार आहे; मात्र त्याचा कुठलाही बाऊ न करता आपल्याला मिळालेले आयुष्य आनंदाने, समाधानाने, समोरच्या व्यक्तीला न दुखावता कसे जगले पाहिजे, याचे उत्तम उदाहरण म्हणून सलोनीकडे पाहावे लागते. समीरच्या एका चुकीमुळे सलोनीला कॉलेज सोडून नोकरीसाठी न्यूझीलंडला जावे लागते. असे जरी असले तरी तिचे

समीरवर खूप प्रेम आहे. माणूस म्हणून त्याच्या मर्यादा समजून ती त्याच्याशी वागण्याचा प्रयत्न करताना दिसते. एक संतुलित अशी व्यक्तिरेखा या ठिकाणी प्रणव सखदेव यांनी निर्माण केल्याचे आपल्याला दिसते.

दादूकाका हा डोंबिवलीला राहणारा अरुणपेक्षा वयाने मोठा असा त्याचा मित्र. दादू एका प्रिंटिंग प्रेसमध्ये ऑफिसबॉय असतो. तो वरच्या जातीतील मुलीबरोबर प्रेम करतो. त्याला तिच्या घरच्यांचा विरोध असतो. एका प्रसंगी दादू आणि त्याची प्रेयसी एकत्र असताना तिचा भाऊ त्यांना पकडतो. यात दादू वाचतो; पण त्याची प्रेयसी भावाच्या मारहाणीमध्ये मरण पावते. आपल्यामुळेच तिचा मृत्यू झाला, त्या मृत्यूला आपणच जबाबदार आहोत, अशी त्याची धारणा असते आणि त्यामुळे तो आयुष्यभर या गोष्टी लक्षात ठेवून पुढे आपल्या हातून असे घडणार नाही, यासाठी तो दक्षता घेत असतो. समीरच्या हिमालयातील अडचणीच्या वेळी दादूच त्याला मदत करतो.

सानिका हे एक महत्त्वाचे पात्र. चैतन्यचे अपघाती जाणे, तिच्या आईच्या मृत्यूचे सत्य समजणे, समीर आणि सानिका यांच्यात जे घडलं या सगळ्याला दिलेली प्रतिक्रिया म्हणून सानिका कोणालाही न सांगता मुळशीच्या एका रिसॉर्टमध्ये जाऊन राहते. तिची मानसिक स्थिती ढासळलेली आहे. ती आत्महत्या करते. त्याचा परिणाम समीरवर प्रचंड होतो.

एकूणच कादंबरीकाराने मोजक्याच पात्रांच्या माध्यमातून कादंबरीला चांगली गती दिली आहे. समीर हे जे कादंबरीचे मुख्य पात्र आहे त्याला चांगली पार्श्वभूमी यातून निर्माण झाल्याचे दिसते.

**भाषाशैली**

प्रणव सखदेव यांची भाषाशैली ही अतिशय महत्त्वाची आहे. त्यांनी कादंबरीसाठी विचारपूर्वक शैली निवडलेली आपल्याला दिसून येते. प्रणव हे आजच्या तरुणाईची भाषा बोलतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांच्या तोंडी इंग्रजी, मराठी, हिंदी भाषा सरमिसळ करून येते. त्याचबरोबर कादंबरीचा नायक समीर अनेकदा बोलण्यात 'मजबूत' या शब्दाचा वापर करतो. उदा. 'त्याचं वाचन मजबूत होतं.' (पृ. १९), 'च्यायला मजबूत ! तू ? पितोस ?' (पृ. २१), 'माझी मजबूत टरकली' (पृ. २३), 'थंडगार वारा चेहऱ्यावर मजबूत बोचत होता' (पृ. ११८) यावरून कादंबरीकाराने समीर या पात्राला विशिष्ट ढब दिल्याचे दिसून येते.

त्याचबरोबर आज अनेक तरुण मुलं बोलत असताना एखाद्या विशिष्ट शब्दाचा वापर पुन्हा पुन्हा करताना किंवा त्याच्यावर जास्त जोर देताना आपल्याला सहजपणे लक्षात येते.

कादंबरीमध्ये संवादाची भाषा ही बोलीभाषा किंवा प्रमाणभाषा असते. लेखक त्या पात्राची गरज पाहून तशी रचना करतो. या ठिकाणी लेखक पात्राच्या संवादात आणि निवेदनातसुद्धा 'प्लीज का ?' (पृ. ६५), लागलीये (पृ. ८३), सांगायचीये (पृ. १११), बोलतीये (पृ. १५४) असे शब्द वापरले आहेत. 'आहे'च्या जागी 'ये' असा शब्द येतो. इथे लेखकाची शैली जास्त परिणामकारक वाटते.

इंग्रजी शब्दांचा वापर हा मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो. मुळातच प्रणव सखदेव हे आजच्या तरुणांची भाषा त्यांच्या कादंबरीमध्ये आणताना दिसतात. त्याचबरोबर नव्वदोत्तर काळात भाषेची सरमिसळ झालेली आहे. त्याचीही झलक कादंबरीमध्ये वेगवेगळ्या पात्रांच्या संवादातून दिसून येते. उदा. 'एके दिवशी वर्गात नोटीस आली. कॉलेजच्या अंधांसाठीच्या खास 'ब्लाइंड सेल'साठी वेगवेगळी कामं करणारे वॉलेंटीयर्स हवे होते. त्यांना पुस्तकं वाचून दाखवणं, पेपर लिहिण्यासाठी रायटर होणं अशी कामं करणं एक्स्पेक्टेड होतं. ज्यांना इंटरेस्ट असेल त्यांनी ब्लाइंड सेलमध्ये नावनोंदणी करायची होती. मला हे काम फारच इंटरेस्टिंग वाटलं किंवा अकरावीत माझ्या सब्जेक्टमध्ये कोणतीही भाषाच नव्हती. तरीही मी मराठीच्या, इंग्लिशच्या लेक्चर्सना बसायचो. आवडायचं मला. त्यामुळे माझं लायकिंग, भाषा, आर्ट किंवा काहीतरी क्रिएट करण्याकडे जास्त आहे हे माझं मलाच समजून चुकलं.'[१] कादंबरीत अशी अनेक उदाहरणे देता येतील, ज्यामध्ये इंग्रजी शब्द, वाक्ये मोठ्या प्रमाणावर आली आहेत.

कादंबरीचे 'काळेकरडे स्ट्रोक्स' हे शीर्षक कादंबरीचा नायक समीर याच्या मानसिकतेवर भाष्य करते. त्याची मनोवस्था, त्यावर ओढले जाणारे ओरखडे, यातून एक काळेपण, करडेपण समीरच्या मनावर उमटताना दिसते. त्याचे प्रतिबिंब शीर्षकात उमटते.

**समारोप**

समीरच्या आयुष्यात चैतन्य आला. त्याच्या अपघाती मृत्यूनंतर एक पोकळी निर्माण झाली. ती पोकळी सानिकाने भरून काढली; पण तीही दूर कुठेतरी

निघून गेली. अरुण होता; पण तोही नोकरी व्यवसायानिमित्त समीरपासून लांब गेला. त्याची जागा सलोनीने घेतली. पुढे सलोनी सोडून निघून गेली. या साऱ्यातून समीरच्या मनामध्ये जी पोकळी निर्माण झाली ती पोकळी 'काळेकरडे स्ट्रोक्स'च्या रूपाने वाचकांसमोर येते. प्रणव सखदेव या कादंबरीच्या माध्यमातून माणसा-माणसांमधील संबंध का घडतात किंवा बिघडतात, माणसं कुठल्या धाग्यांनी एकत्र येतात, जवळ येतात आणि कोणत्या क्षणी अचानक दूर जातात, या साऱ्याचा शोध या कादंबरीच्या माध्यमातून घेताना दिसतात.

**संदर्भ**


१) प्रणव सखदेव, काळेकरडे स्ट्रोक्स, रोहन प्रकाशन, पुणे, ति. आ. २०२१, पृ. ५७.
२) तत्रैव, पृ. ६४.
३) तत्रैव, पृ. ६१.
४) तत्रैव, पृ. २८.
५) तत्रैव, पृ. १३०.
६) तत्रैव, पृ. १२.



– डॉ. सुधीर बब्रुवान मोरे
साहाय्यक प्राध्यापक (मराठी),
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.
मोबा. : ९४२२०००६११
ईमेल – sudhirraomore@gmail.com


★ ★ ★



## Journal Details

| | |
|---|---|
| Journal Title (in English Language) | Bhav Anubhandh (print only) \| (Current Table of Content) |
| Journal Title (in Regional Language) | भाव अनुबंध (print only) |
| Publication Language | Marathi |
| Publisher | Marathi Sahitya Mandal |
| ISSN | NA |
| E-ISSN | NA |
| Discipline | Arts and Humanities |
| Subject | Arts and Humanities (all) |
| Focus Subject | Literature and Literary Theory |
| UGC-CARE coverage year | from June-2019 to Present |

Scanned by CamScanner

## Journal Details

| | |
|---|---|
| Journal Title (in English Language) | Bhav Anubhandh (print only) \| (Current Table of Content) |
| Journal Title (in Regional Language) | भाव अनुबंध (print only) |
| Publication Language | Marathi |
| Publisher | Marathi Sahitya Mandal |
| ISSN | NA |
| E-ISSN | NA |
| Discipline | Arts and Humanities |
| Subject | Arts and Humanities (all) |
| Focus Subject | Literature and Literary Theory |
| UGC-CARE coverage year | from June-2019 to Present |

Scanned by CamScanner

# काळेकरडे स्ट्रोक्स : एक उदास पोकळी

• डॉ. सुधीर ब. मोरे

मराठीतल्या आजच्या महत्त्वाच्या तरुण लेखकांमध्ये प्रणव सखदेव यांना गणले जाते. प्रणव सखदेव यांनी कविता, कथा आणि कादंबरी हे तीनही सर्जनशील साहित्यप्रकार हाताळले आहेत. विविध दैनिकांच्या पुरवण्या, दिवाळी अंक आणि नियतकालिकांमधून त्यांच्या कथा-कविता सातत्याने प्रकाशित होतात. 'काळेकरडे स्ट्रोक्स' (२०१८), '९६ मेट्रोमॉल' (२०२०) ह्या त्यांच्या कादंबऱ्या, 'निळ्या दाताची दंतकथा', 'नाभीतून उगवलेल्या वृक्षाचं रहस्य' हे दोन कथासंग्रह आहेत, तर 'पायऱ्यांचा गेम आणि इतर कविता' हा त्यांचा कवितासंग्रह आहे. प्रणव सखदेव यांना त्यांच्या लेखनासाठी विविध पुरस्कार मिळाले आहेत; त्याचबरोबर कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक यांच्यातर्फे दिली जाणारी २०१५-१६ सालासाठीची अभ्यासवृत्तीही प्राप्त झालेली आहे. 'काळेकरडे स्ट्रोक्स' या कादंबरीला २०२१चा साहित्य अकादमी युवा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. तरुण पिढीची भाषा बोलणारा एक लेखक म्हणून त्यांच्या साहित्याकडे पाहावे लागते.

'काळेकरडे स्ट्रोक्स' ही प्रणव सखदेव यांची २०१८ साली प्रकाशित झालेली कादंबरी आहे. उदासी, मानसिक रिकामेपण आणि मी कोण पेक्षा मी काय आहे ? याचा शोध घेणारी ही प्रेमकथा आहे. दहा वर्षांपूर्वीच्या आठवणी समीरच्या सांगण्याने ह्या कादंबरीची सुरुवात होते आणि फ्लॅशबॅक तंत्राने कादंबरी मागे जाते. शेवटी कादंबरी संपत असताना कथानक पुन्हा एकदा वर्तमानात येते.

**कथानक**

समीर या कादंबरीचा नायक आहे, चारचौघांसारखे आयुष्य जगणाऱ्या त्याच्या आई-बाबांना तो डॉक्टर किंवा सॉफ्टवेअर इंजिनियर व्हावं असे वाटत असते; मात्र समीर मास कम्युनिकेशन करण्यासाठी कला शाखा निवडतो. त्याची क्रिएटिव्हिटी ही फिल्म तयार करणे आणि पोटापाण्याचा प्रश्न म्हणून इलेक्ट्रॉनिक



Scanned by CamScanner

मीडिया किंवा जाहिरात क्षेत्रामध्ये नोकरी करून रोजचे प्रश्न सोडवणे हा आहे. फिल्म ही त्याची पॅशन आहे. त्यासाठी राहिलेला वेळ देणे हा त्याचा उद्देश असतो. आई-बाबा मात्र या क्षेत्रनिवडीवरून रागावतात. समीरचे कौटुंबिक नातेसंबंध हे तसे वरवरचेच निर्माण झालेले होते. आई-बाबा आणि समीर यांच्या नात्यात एक गुंता तयार झालेला आहे आणि तो शेवटपर्यंत तसाच राहतो, तो कोणालाच सोडवता आलेला नाही. त्यामुळे समीर घरी केवळ झोपायला आणि जेवायला एवढ्यासाठीच जात होता. त्याचे जिव्हाळ्याचे संबंध हे बाहेरील मित्र-मैत्रिणी यांच्यामधून तो मिळवत असताना आपल्याला दिसून येतो.

समीर बारावीपासूनच कोणत्याही ग्रुपमध्ये नाही. रूईया कॉलेजमध्ये अंध विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी एक ब्लाइंड सेल आहे, तिथे तो जातो. त्या ठिकाणी सानिका आणि चैतन्य यांच्याबरोबर त्याची घनिष्ठ मैत्री होते. चैतन्य हा अंध विद्यार्थी असला तरी जीवनाचे तत्त्वज्ञान त्याला चांगले समजले आहे. चैतन्य कॉलेजांत एक फोन बूथही चालवत असतो. या बूथमध्ये बसून सानिका, चैतन्य आणि समीर विविध विषयांवर चर्चा करतात, गाणी म्हणतात. एकत्र चित्रपट पाहायलाही जातात. या तिघांचे ट्युनिंग चांगले जमलेले असते. चैतन्य आणि सानिका हे दोघं समीरच्या आयुष्यातील एक अविभाज्य भाग होते. समीर त्या दोघांना कधीच विसरू शकत नाही. सानिका आणि चैतन्य हे दोघं एकमेकांच्या प्रेमात असतात. पुढे चैतन्यचा अपघाती मृत्यू होतो आणि सानिका उद्ध्वस्त होते. या दोघांच्या आयुष्याचा परिणाम समीरच्या मनात उदास पोकळी निर्माण होण्यात होतो. समीरच्या आयुष्यात ज्या ज्या ठिकाणी ही पोकळी निर्माण झालेली आहे, त्याच्या पाठीमागे काही घटना, प्रसंग हे असल्याचे आपल्याला दिसून येते.

सानिका आणि समीर यांच्या नात्यात सुरुवातीपासूनच एक निखळ मैत्री असते, मात्र चैतन्यच्या अपघाती मृत्यूने सानिका ढासळते. तिला सावरत असताना समीर तिच्या जवळ जातो, तिला सावरू पाहतो. सानिकाला तिच्या आईच्या मृत्यूबद्दलचे सत्य समजल्यानंतर ती कोलमडते. त्यावेळी समीरला तिच्या घरी बोलावते. यावेळी समीर आणि सानिका मैत्रीचे सर्व बंध तोडून शारीरिकदृष्ट्या एक होतात; पण सानिका शेवटी चैतन्यचे नाव घेते आणि समीरला या ठिकाणी धक्का बसतो. ती इतके दिवस होऊनही चैतन्यला विसरलेली नाही किंवा तिने समीरला मनाने जवळ केलेले नाही, याचा परिणाम समीरवर होतो. सानिकाच्या



Scanned by CamScanner

घरी घडलेल्या प्रसंगानंतर समीरची अवस्था वाईट होते. त्याला अपराधी वाटू लागते. त्यातून त्याच्या मनात एक उदास पोकळी भरून येते.

सानिका समीरच्या आयुष्यातून निघून जाते. तिचा कसलाही संपर्क होत नाही. त्यावेळी समीरच्या मनात उदास पोकळी निर्माण होते. त्याला वाटतं, आपल्या आयुष्यातून सानिका आता कायमची निघून गेली आहे. त्यावेळी तो म्हणतो, 'सावरीच्या शेंगेत कशा कापसाला लागलेल्या बिया असतात, तसे आम्ही होतो. एक दिवस शेंग फुटते आणि एवढे दिवस एकमेकांच्या सोबत असलेल्या म्हाताऱ्या वाऱ्यावर दूरवर विखरून जातात, पुन्हा कधीही न भेटण्यासाठी, तसंच आमचं झालंय.'[१] यात सानिका आणि समीरचे विखुरलेपण चित्रित होते, तर समीर आणि सलोनी यांच्यामध्ये काही भेटीनंतर समीरला असं वाटतं की, ते कितीतरी दिवसांपासून एकमेकांना ओळखत आहेत. त्यावेळी तो म्हणतो, 'आमच्यात काहीतरी जुळून आलंय नकळतपणे. कुठूनतरी कसल्यातरी बिया वाऱ्यावरून रिकाम्या कुंडीत पडाव्यात आणि थोड्याच दिवसांत त्यातून रोपं तरारून यावीत तसं ?'[२] या ठिकाणी सानिकाचे निघून जाणे किंवा सलोनी समीरच्या आयुष्यात येणे या दोन्ही घटनांच्या वेळी हातातून निसटणं आणि पुन्हा नव्याने काहीतरी सापडणे या अनुषंगाने ह्या घटना कादंबरीकार चित्रित करताना दिसतात.

पुढे समीर सलोनीच्या प्रेमात पडतो. समीरला दारू, सिगारेट, गांजा या सर्वांचे व्यसन लागलेले असते. ज्यावेळी त्याच्या मनात उदास पोकळी भरून येते, त्यावेळेस तो या व्यसनांच्या आहारी जाताना दिसतो. सलोनीच्या सहवासात आल्यानंतर त्याला एक चांगला आधार, सोबती मिळतो; मात्र तीही थोड्याच दिवसांसाठी. सानिका ही मुळशी या ठिकाणी असते. तिचा पत्ता समीरला मिळतो. तो त्या ठिकाणी तिला भेटायला जातो. तिला भेटल्यानंतर तिची मानसिक अवस्था बिकट असल्याचे त्याच्या लक्षात येते. चैतन्यचा मृत्यू, समीरशी घडलेला प्रसंग, आईच्या मृत्यूचे सत्य या साऱ्याचा परिणाम तिच्यावर झालेला असतो. याच परिणामातून ती मुळशीच्या तळ्यामध्ये आत्महत्या करते. या घटनेतून समीर ढासळतो. एका सनकीमध्ये तो सलोनीला लेक्चरमधून बाहेर ओढून आणतो आणि जेन्टस् टॉयलेटमध्ये तिच्यावर बळजबरी करण्याचा प्रयत्न करतो. या घटनेमुळे समीरला कॉलेजमधून काढले जाते. वर्तमानपत्रांमध्ये तशा बातम्या येतात. सलोनी समीरला सोडून न्यूझीलंडला निघून जाते. समीर उद्ध्वस्त मानसिकतेत हिमाचल



Scanned by CamScanner

प्रदेशला जातो. परत माघारी येतो. या ठिकाणी त्याला आपल्याकडून झालेल्या चुका लक्षात येतात. त्याचा मित्र दादू हा त्याला बाहेर पडण्यासाठी मदत करतो. पुढे तो कष्ट करून चांगला दिग्दर्शक होतो. त्याची एक डॉक्युमेंटरी 'औदुंबर' या नावाने येते. ती प्रेक्षकांच्या पसंतीस उतरते. समीरच्या जवळ असलेल्या ज्या व्यक्ती आहेत, त्यामध्ये सानिका, सलोनी, अरुण, दादू या सर्वांची स्वतःची एक स्वतंत्र कहाणी आहे. त्यातूनच ही कादंबरी पुढे जात राहते.

**नव्वदोत्तर काळ**

या कादंबरीचे कथानक २००० सालच्या पहिल्या दशकातील असल्याचे आपल्याला दिसून येते. अर्थव्यवस्थेत झालेल्या मूलगामी बदलांमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत परिवर्तन घडून आलेले आहे. झालेले हे बदल फक्त जगाच्या भौतिक पातळीवरचे नाहीत, तर मानवी नातेसंबंध, त्यांचे भावनिकत्व, भाषा, समाजातील मूल्यव्यवस्था इतक्या खोलवर हे बदल झालेले आहेत. हा काळ बाजारकेंद्री आहे. त्यामुळे माणसाचे ग्राहकात रूपांतर झालेले आहे. त्यांच्या माणूसपणापेक्षा त्याचे ग्राहकत्व महत्त्वाचे मानले जात आहे. जागतिकीकरणाच्या सांस्कृतिक आक्रमणाने पूर्वापार चालत आलेले आपले संचित नष्ट केले जात आहे. अमेरिकेचा साम्राज्यवाद, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व, वाढते संगणकीकरण आणि संपर्क माध्यमांचे अतिक्रमण, माहिती-तंत्रज्ञानाचा विस्फोट, धर्मांध ध्रुवीकरण, दहशतवाद, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती आर्थिक विषमता आणि बेरोजगारी, लोकचळवळीचा होणारा ऱ्हास, इंग्रजीचा जागतिक भाषा म्हणून झालेला उदय व जगभरातील नष्ट होत असलेल्या बोलीभाषा, पर्यावरणाचा विनाश या साऱ्यांमुळे नव्वदोत्तर कालखंड काळवंडून गेल्याचे दिसते. या काळातील पिढीची मानसिकता, त्यांचे जगणे, त्यांचे विचार, त्यांची मते, समाजातील त्यांचे वागणे, घरातील नातेसंबंध, त्याचबरोबर समाजात मित्रमैत्रिणींशी असणारे नातेसंबंध हे सर्व या कादंबरीमधून प्रणव सखदेव यांनी मांडलेले आहे.

नुकतेच मोबाईल सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचत होते. अरुण समीरला एका पडक्या इमारतीमध्ये नेतो. या ठिकाणी ते चोर बाजारातील एक मोबाईल खरेदी करतात. समीर यावेळी त्याला वॉरंटीबद्दल विचारतो. तेव्हा अरुण म्हणतो, ''मधे ते हैदराबादला लुंबिनी पार्कमध्ये बॉम्बस्फोट झाले ना, कितीतरी असेच फोन्स पडले होते तिथे. तो सगळा माल चोरून इथे आलाय. यावर कसली आलीय



Scanned by CamScanner

वॉरंटीबिरंटी ? इथे जिंदगीचा ना ठिकाणा !'[३] हजारो नागरिक या धर्मांधतेत बळी गेले. बॉम्बस्फोट हे धर्मांधतेचे अतिशय क्रूर टोक असल्याचे आपल्याला दिसून येते.

आजच्या तरुणाईचे विश्लेषण करणे कठीण आहे. कारण या पिढीमध्ये अनेक बदल स्वीकारून पुढे जाणे, त्यासाठी लागेल ते कष्ट करणे ही बाजू दिसते, तर दुसरीकडे आज, आत्ता, ताबडतोब गोष्टी मिळविण्यात ही पिढी पुढे धावताना दिसते. चैतन्य आजच्या पिढीबद्दल बोलताना समीरला म्हणतो, "तू ना, आहेस हुशार; पण तुला काही करायला नको. आळशी आहेस नुसता. हा तुझा नाही, तर तुमच्या सगळ्या पिढीचाच प्रॉब्लेम आहे."[४] आजच्या पिढीला वेगळे काहीतरी करायचे आहे; मात्र त्यासाठी लागणारे कष्ट, सातत्य नको आहेत. विचार केला आणि लगेच तो पूर्ण झाला असे होत नाही, त्यासाठी कष्ट करावे लागतात. त्यामुळेच चैतन्य आजच्या पिढीवर वरील भाष्य करतो. तर दुसरीकडे सानिकाचे वडील सानिकावर रागवून म्हणतात, "या पिढीला कष्टबिष्ट करणे काही माहितीच नाहीये. सगळं सरळ मिळतंय हाता-तोंडाशी मग काय ? नाहीतर आपण कुठे कुठे जायचो बिजनेस मिळवायला, कसेही राहायचो, काहीही खायचो, प्यायचो."[५] नव्वदोत्तर काळातील पिढीवर आळशीपणाचे, मुबलकतेचे आरोप होतात; मात्र दुसरीकडे हीच पिढी स्वतःच्या हिमतीवरती, धाडसाने काही करू पाहते, मळवाटेने न जाता स्वतःची वाट निर्माण करण्याचाही प्रयत्न हीच पिढी करताना आपणास दिसून येते.

**लैंगिकता**

कादंबरीत लैंगिक विषय मोकळेपणाने मांडला आहे. अरुण हा अतिशय बोल्ड विचारांचा समीरचा मित्र आहे. तो पोरी पटविण्यात व त्यांच्याशी शरीरसंबंध स्थापन करण्यात अतिशय पटाईत आहे. याबाबत कादंबरीमध्ये जे चित्रण आलेले आहे ते अतिशय मोकळेपणाने प्रणव सखदेव यांनी मांडलेले आहे. अरुण त्याच्या खोलीवरती कॉलगर्ल, वेश्या किंवा मैत्रिणी घेऊन येत असतो. तेथेच समीरसुद्धा असतो; मात्र त्याला कुठलीही लाज याबाबत वाटत नाही. त्याच्या वागण्यामध्ये एक प्रकारचा मुक्तपणा असल्याचे दिसून येते. कादंबरीकारसुद्धा हे प्रसंग चित्रित करत असताना अतिशय संयतपणे, कुठलाही बटबटीतपणा न येऊ देता करताना दिसतो. अरुण आणि त्याची वहिनी या दोघांमधील प्रसंग अतिशय भावनिक

आहे. शरीरसंबंधात सरावलेला अरुण वहिनीच्या विनंतीसमोर मात्र हतबल होतो, उदास होतो. त्यावेळी त्याला काहीही सुचत नाही. त्याच्या मनामध्ये एक अपराधी भावना निर्माण होते.

समीर वेगवेगळ्या मुलींच्या संपर्कात येतो. ज्यामध्ये सानिका, सलोनी, अरुणची मैत्रीण चिंकी यांचा उल्लेख करता येतो. या सर्वांच्या घटनांमध्ये शरीरसंबंधाची वर्णने येतात; मात्र ही येत असताना कादंबरीकार वातावरणनिर्मिती, त्या आशयाची गरज, पात्राची मानसिकता या साऱ्यांचा विचार करून वर्णन त्या ठिकाणी येताना दिसते. येथे केवळ सणसणाटी काही देणे इतकाच त्यामागचा उद्देश असल्याचे दिसत नाही.

**व्यक्तिरेखा**

'काळेकरडे स्ट्रोक्स' या कादंबरीमध्ये मोजकीच पात्रे असल्याचे आपल्याला दिसून येते. यामध्ये अरुण, सानिका, सलोनी आणि दादूकाका या महत्त्वाच्या व्यक्तिरेखा होत. या सर्वांची स्वतंत्र अशी कहाणी आहे.

अरुण हा समीरपेक्षा वयाने मोठा आहे. तो या कॉलेजचा विद्यार्थी नाही; पण समीर आणि त्याच्यात साहित्यप्रेमामुळे मैत्री होते. अरुणची परळमध्ये भाड्याने घेतलेली खोली आहे. तिथे तो एकटाच राहत असतो. अरुणशी मैत्री झाल्यावर समीरही ह्या खोलीवर जाऊ लागतो. अरुणच्या संगतीने त्याला दारू, गांजा, अफूची सवय लागते. अरुण तिथे पैसे देऊन मुलींना आणत असतो. एकूणच अनियंत्रित असे त्याचे वागणे असल्याचे दिसते. मात्र जीवनाबद्दलची त्याची समज चांगली असल्याचे दिसते. वहिनीला मूल होत नाही, अरुणचा दादा त्यासाठी सक्षम नसतो; मात्र वहिनीची विनंती व तिची परिस्थिती लक्षात घेऊन तो त्यासाठी तयार होतो. एक 'गिल्टी' भावना सोबत ठेवूनच तो पुढे जगतो.

सलोनी ही रूईया कॉलेजमध्येच शिकणारी वाणिज्यची विद्यार्थिनी आहे. समीर व सलोनीची ओळख होते आणि ते एकमेकांकडे आकर्षिले जातात. सलोनी एक स्वतंत्र विचाराची समजूतदार अशी मुलगी आहे. तिला हा दुर्धर आजार आहे; मात्र त्याचा कुठलाही बाऊ न करता आपल्याला मिळालेले आयुष्य आनंदाने, समाधानाने, समोरच्या व्यक्तीला न दुखावता कसे जगले पाहिजे, याचे उत्तम उदाहरण म्हणून सलोनीकडे पाहावे लागते. समीरच्या एका चुकीमुळे सलोनीला कॉलेज सोडून नोकरीसाठी न्यूझीलंडला जावे लागते. असे जरी असले तरी तिचे



Scanned by CamScanner

समीरवर खूप प्रेम आहे. माणूस म्हणून त्याच्या मर्यादा समजून ती त्याच्याशी वागण्याचा प्रयत्न करताना दिसते. एक संतुलित अशी व्यक्तिरेखा या ठिकाणी प्रणव सखदेव यांनी निर्माण केल्याचे आपल्याला दिसते.

दादूकाका हा डोंबिवलीला राहणारा अरुणपेक्षा वयाने मोठा असा त्याचा मित्र. दादू एका प्रिंटिंग प्रेसमध्ये ऑफिसबॉय असतो. तो वरच्या जातीतील मुलीबरोबर प्रेम करतो. त्याला तिच्या घरच्यांचा विरोध असतो. एका प्रसंगी दादू आणि त्याची प्रेयसी एकत्र असताना तिचा भाऊ त्यांना पकडतो. यात दादू वाचतो; पण त्याची प्रेयसी भावाच्या मारहाणीमध्ये मरण पावते. आपल्यामुळेच तिचा मृत्यू झाला, त्या मृत्यूला आपणच जबाबदार आहोत, अशी त्याची धारणा असते आणि त्यामुळे तो आयुष्यभर या गोष्टी लक्षात ठेवून पुढे आपल्या हातून असे घडणार नाही, यासाठी तो दक्षता घेत असतो. समीरच्या हिमालयातील अडचणीच्या वेळी दादूच त्याला मदत करतो.

सानिका हे एक महत्त्वाचे पात्र. चैतन्यचे अपघाती जाणे, तिच्या आईच्या मृत्यूचे सत्य समजणे, समीर आणि सानिका यांच्यात जे घडलं या सगळ्याला दिलेली प्रतिक्रिया म्हणून सानिका कोणालाही न सांगता मुळशीच्या एका रिसॉर्टमध्ये जाऊन राहते. तिची मानसिक स्थिती ढासळलेली आहे. ती आत्महत्या करते. त्याचा परिणाम समीरवर प्रचंड होतो.

एकूणच कादंबरीकाराने मोजक्याच पत्रांच्या माध्यमातून कादंबरीला चांगली गती दिली आहे. समीर हे जे कादंबरीचे मुख्य पात्र आहे त्याला चांगली पार्श्वभूमी यातून निर्माण झाल्याचे दिसते.

**भाषाशैली**

प्रणव सखदेव यांची भाषाशैली ही अतिशय महत्त्वाची आहे. त्यांनी कादंबरीसाठी विचारपूर्वक शैली निवडलेली आपल्याला दिसून येते. प्रणव हे आजच्या तरुणाईची भाषा बोलतात. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिरेखांच्या तोंडी इंग्रजी, मराठी, हिंदी भाषा सरमिसळ करून येते. त्याचबरोबर कादंबरीचा नायक समीर अनेकदा बोलण्यात 'मजबूत' या शब्दाचा वापर करतो. उदा. 'त्याचं वाचन मजबूत होतं.' (पृ. १९), 'च्यायला मजबूत ! तू ? पितोस ?' (पृ. २१), 'माझी मजबूत टरकली' (पृ. २३), 'थंडगार वारा चेहऱ्यावर मजबूत बोचत होता' (पृ. ११८) यावरून कादंबरीकाराने समीर या पात्राला विशिष्ट ढब दिल्याचे दिसून येते.



Scanned by CamScanner

त्याचबरोबर आज अनेक तरुण मुलं बोलत असताना एखाद्या विशिष्ट शब्दाचा वापर पुन्हा पुन्हा करताना किंवा त्याच्यावर जास्त जोर देताना आपल्याला सहजपणे लक्षात येते.

कादंबरीमध्ये संवादाची भाषा ही बोलीभाषा किंवा प्रमाणभाषा असते. लेखक त्या पात्राची गरज पाहून तशी रचना करतो. या ठिकाणी लेखक पात्राच्या संवादात आणि निवेदनातसुद्धा प्लॅने का ? (पृ. ६५), लागलीये (पृ. ८३), सांगायचीये (पृ. १११), बोलतीये (पृ. १५४) असे शब्द वापरले आहेत. 'आहे'च्या जागी 'ये' असा शब्द येतो. इथे लेखकाची शैली जास्त परिणामकारक वाटते.

इंग्रजी शब्दांचा वापर हा मोठ्या प्रमाणावर होताना दिसतो. मुळातच प्रणव सखदेव हे आजच्या तरुणांची भाषा त्यांच्या कादंबरीमध्ये आणताना दिसतात. त्याचबरोबर नव्वदोत्तर काळात भाषेची सरमिसळ झालेली आहे. त्याचीही झलक कादंबरीमध्ये वेगवेगळ्या पात्रांच्या संवादातून दिसून येते. उदा. 'एके दिवशी वर्गात नोटीस आली. कॉलेजच्या अंधांसाठीच्या खास 'ब्लाइंड सेल'साठी वेगवेगळी कामं करणारे वॉलेंटीयर्स हवे होते. त्यांना पुस्तकं वाचून दाखवणं, पेपर लिहिण्यासाठी रायटर होणं अशी कामं करणं एक्स्पेक्टेड होतं. ज्यांना इंटरेस्ट असेल त्यांनी ब्लाइंड सेलमध्ये नावनोंदणी करायची होती. मला हे काम फारच इंटरेस्टिंग वाटलं किंवा अकरावीत माझ्या सब्जेक्टमध्ये कोणतीही भाषाच नव्हती. तरीही मी मराठीच्या, इंग्लिशच्या लेक्चर्सना बसायचो. आवडायचं मला. त्यामुळे माझं लायकिंग, भाषा, आर्ट किंवा काहीतरी क्रिएट करण्याकडे जास्त आहे हे माझं मलाच समजून चुकलं.'[६] कादंबरीत अशी अनेक उदाहरणे देता येतील, ज्यामध्ये इंग्रजी शब्द, वाक्ये मोठ्या प्रमाणावर आली आहेत.

कादंबरीचे 'काळेकरडे स्ट्रोक्स' हे शीर्षक कादंबरीचा नायक समीर याच्या मानसिकतेवर भाष्य करते. त्याची मनोवस्था, त्यावर ओढले जाणारे ओरखडे, यातून एक काळेपण, करडेपण समीरच्या मनावर उमटताना दिसते. त्याचे प्रतिबिंब शीर्षकात उमटते.

**समारोप**

समीरच्या आयुष्यात चैतन्य आला. त्याच्या अपघाती मृत्यूनंतर एक पोकळी निर्माण झाली. ती पोकळी सानिकाने भरून काढली; पण तीही दूर कुठेतरी



Scanned by CamScanner

निघून गेली. अरुण होता; पण तोही नोकरी व्यवसायानिमित्त समीरपासून लांब गेला. त्याची जागा सलोनीने घेतली. पुढे सलोनी सोडून निघून गेली. या साऱ्यातून समीरच्या मनामध्ये जी पोकळी निर्माण झाली ती पोकळी 'काळेकरडे स्ट्रोक्स'च्या रूपाने वाचकांसमोर येते. प्रणव सखदेव या कादंबरीच्या माध्यमातून माणसा-माणसांमधील संबंध का घडतात किंवा बिघडतात, माणसं कुठल्या धाग्यांनी एकत्र येतात, जवळ येतात आणि कोणत्या क्षणी अचानक दूर जातात, या साऱ्याचा शोध या कादंबरीच्या माध्यमातून घेताना दिसतात.

**संदर्भ**


१) प्रणव सखदेव, काळेकरडे स्ट्रोक्स, रोहन प्रकाशन, पुणे, ति. आ. २०२१, पृ. ५७.

२) तत्रैव, पृ. ६४.

३) तत्रैव, पृ. ६१.

४) तत्रैव, पृ. २८.

५) तत्रैव, पृ. १३०.

६) तत्रैव, पृ. १२.



**- डॉ. सुधीर बब्रुवान मोरे**

साहाय्यक प्राध्यापक (मराठी),

वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर.

मोबा. : ९४२२०००६११

ईमेल - sudhirraomore@gmail.com


★ ★ ★



Scanned by CamScanner

मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)

या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned by CamScanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ९ अंक : ३

चैत्र, वैशाख, ज्येष्ठ शके १९४५
एप्रिल, मे, जून २०२३

---

मानद संपादक : श्री. पवनकुमार देशपांडे
कार्यकारी संपादक : श्री. सर्वोत्तम सताळकर
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ
श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर
सौ. वंदना किणीकर ★ सौ. शीतल देऊळगावकर
डॉ. योगेश्वर देशपांडे

---

संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

( संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

Scanned by CamScanner

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- नांदीचे बदलते स्वरूप : एक चिकित्सक शोध / प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी ६
- मराठी कथा-कादंबरी वाङ्मयातील गांधीविचारांचे संदर्भ आणि अवलोकन / प्रा. उन्नती संजय चौधरी १२
- साहित्यिक कार्यकर्ते : श्री. भालचंद्र शिंदे / सुनील अंबिके २७
- भाषेचा अभिक्षेत्रीय व कालिक वितरणाचा अभ्यास / डॉ. संदीप रु. मसराम/डॉ. सुधीर ब. मोरे ३१
- चारोळी : एक साहित्यप्रकार / डॉ. दत्ता पांडुरंग सरगर ३८
- अभावाचा ज्वर (कथा) / जयश्री दाणी ४३
- गानतपस्विनी सौ. सरोज अनगरकर / व्यंकटेश वळसंगकर ५२
- सूर्यकुलातला ऊर्जावान कवी : डी. बी. जगत्पुरिया / डॉ. श्रीपाल सबनीस ५४
- कथाकार वामन चोरघडे / राम देशपांडे ५९
- कविता.... कविता.... कविता.... कविता.... ६५
- विराट विश्वकर्मा / शकुंतला सोनार ७१
- हास्ययोग / सतीश देशपांडे ७५
- मंडळाची वाटचाल..... ७८


Scanned by CamScanner

# भाषेचा अभिक्षेत्रीय व कालिक वितरणाचा अभ्यास

• डॉ. संदीप रू. मसराम/डॉ. सुधीर ब. मोरे

## प्रास्ताविक

भाषा ही समाजीकरण तसेच सांस्कृतिक प्रचाराचे सशक्त साधन आहे. भाषा मानव समूहातील सदस्यांमध्ये आंतरक्रियेला सुगम आणि प्रभावी बनविते. तसेच त्यांना घनिष्ठ रूपामध्ये संयुक्त करण्याचे कार्य करते. तसेच ती लिखित आणि मौखिक दोन्ही स्वरूपात संदेशवहनाचे महत्त्वपूर्ण साधन आहे. पिढ्यानूपिढ्या सांस्कृतिक हस्तांतरणात भाषा सर्वात महत्त्वाचे साधन आहे. संस्कृतीच्या विविध प्रतीकांमधील भाषा ही समाज आणि संस्कृती यांच्यातील स्थानिक भिन्नतेला समजण्याकरिता साहाय्यक आहे. भाषेच्या माध्यमातून विचारांचे आदान प्रदान तसेच सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक प्रक्रियेच्या संचालनामध्ये सुलभता निर्माण होते. जर भाषा नसेल तर हे कार्य जवळपास अशक्य होईल. त्यामुळे भाषा ही मानव जातीची असाधारण संपत्ती आहे.

बोली ही भाषेचाच एक भाग आहे. तिचा प्रयोग सामान्यत: स्थानिक समूहातील लोकांद्वारे प्रादेशिक स्तरावर केला जातो. एकाच भाषेतील विभिन्न बोलीतील शब्द तसेच त्यांचे अर्थ आणि शब्दांचे उच्चारण यामध्ये इतकी समानता आढळून येते की, त्या भाषेला समजणारे लोक आपल्यापेक्षा भिन्न बोलीलासुद्धा काही अंशापर्यंत समजू शकतात. क्षेत्रीय वितरणाच्या दृष्टीने बोली इतकी परिवर्तनशील असते की, थोड्या दूर अंतरावर त्यामध्ये बदल झाल्याचे लक्षात येते.

## अभ्यासाचा उद्देश

भाषेच्या उदयापासून आजतागायत तिच्या विकासात अभिक्षेत्रीय व कालिक बदल होत आलेला आहे. भाषेतील या बदलाला इतर घटकांसोबत भौगोलिक घटकही कारणीभूत आहेत. विशिष्ट अंतरावर भाषेतही थोडेफार बदल



Scanned by CamScanner

होत असल्याचे निदर्शनास येते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भाषेचा भौगोलिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे हा मुख्य उद्देश आहे. सोबतच सदर शोधनिबंधामध्ये खालील उद्देशांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१. भाषेच्या अभिक्षेत्रीय वितरणाचा अभ्यास करणे.

२. भाषेच्या विकासात कालिक वितरणाचा अभ्यास करणे.

**भाषेचा अभिक्षेत्रीय व कालिक अभ्यास**

जगातील विविध देशांमध्ये एक भाषा प्रचलित आहे; परंतु काही देशांत सांस्कृतिक, ऐतिहासिक व राजकीय कारणांमुळे एकापेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात. त्या भाषा राज्यस्तरांवर स्वीकृत आहेत. बऱ्याचदा भाषेवरून राजकीय विवादही होतात. विशेषत्वाने ज्या प्रदेशात सीमावर्ती भागात एकापेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात, त्या प्रदेशात भाषिक समस्या निर्माण होते. ही समस्या आंतरराष्ट्रीय व आंतरराज्यीय दोन्ही प्रकारची आहे. उदा. कॅनडा देशात मुख्य भाषा इंग्रजी आहे; परंतु क्युबेक पूर्व प्रांतात फ्रेंच भाषिक लोक राहतात त्यामुळे तेथे भाषिक समस्या निर्माण झाली होती. याचप्रमाणे श्रीलंका या देशात सिंहली-तामिळ भाषा ही समस्या आहे. सोमालिया आणि इथियोपिया यांच्यातील समस्येचे एक कारण भाषा आहे. खूपदा अनेक भाषांच्या मिश्रणातून नवीन भाषेचा उदय होतो. भारतात उर्दू भाषा तुर्की, फारसी आणि भारतीय भाषांच्या मिश्रणातून बनलेली आहे.

ना. गो. कालेलकर भाषेच्या अभ्यासाबाबत म्हणतात, 'भाषा ही विधानरूपाने आपल्यासमोर असते. तिचे पृथःकरण करता करता शब्द आणि वर्ण आपल्या हाती येतात, वर्णांना शब्दांत होणारे विकार आणि शब्दांना विधानात होणारे विकार यांचा अभ्यास हा भाषेचा अभ्यास होय.'[१] भाषेचे ज्ञान मनुष्याकरिता आवश्यक आहे. भाषेच्या ज्ञानामुळेच मनुष्य हा पशुसमूहापेक्षा वेगळा आणि विकसित झाला आहे. तसेच ज्ञानाचे संचयन आणि स्थानांतरण करणे शक्य झाले असते. भाषेच्या साहाय्याने मानवाने आपले प्राकृतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संगठन निर्माण केले. भाषेमुळे संस्कृतीच्या सृजनात्मक पक्षाला प्रोत्साहन मिळते. त्यानंतरच संस्कृती हळूहळू परिपक्व होऊ लागते, मानवी मेंदूमध्ये भाषा संपादन करण्याचे जे सामर्थ्य असते त्याला 'भाषिक क्षमता' असे म्हणतात. या भाषिक क्षमतेमुळेच मानव इतर प्राण्यांहून वेगळा ठरतो. मानव हा एकमात्र जीव



Scanned by CamScanner

आहे, जो भाषेचा आणि लिपीचा प्रयोग करतो. याबाबत सुरेंद्र ग्रामोपाध्ये म्हणतात, 'मानवी व्यवहारातील भाषा हा एक महत्त्वाचा घटक आहे. ज्ञानाच्या संवेदनांच्या व जाणिवांच्या कक्षा रूंदावत असताना त्यांच्या अभिव्यक्तीचे माध्यम जी भाषा, तिचा विकास व समृद्धी लक्षणीय स्वरूपात झालेली दिसायला हवीत.'[२] भाषा आणि तिच्या वापरामुळे मानवी अभिव्यक्तीला स्वातंत्र्य मिळते.

### भाषा आणि पर्यावरण

भाषा आणि पर्यावरण यांच्यातही सहसंबंध असल्याचे आपल्याला दिसून येते. भूपृष्ठाचा आकार तसेच स्वरूपाचा भाषेवर प्रभाव पडत असतो. विस्तृत भूभागावर अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात. विस्तृत क्षेत्रात राहणाऱ्या मानवांच्या अनेक आवश्यकता असतात. या आवश्यकतेच्या पूर्ततेसाठी मानव आपल्या सभोवताली असलेल्या अन्य क्षेत्रांसोबत संबंध प्रस्थापित करतो. परिणामस्वरूप अनेक भाषांचा त्याच्या मूळ भाषेवर प्रभाव पडत असतो. भाषेमध्ये अनेक नवनवीन शब्दांची रचना होत असते. राष्ट्रीय विस्तार, नवीन हितसंबंधाचा विकास, नवनवीन गरजांच्या कारणाने भाषा मिश्रित होत असावी. भूपृष्ठाच्या बनावटीनुसार त्या प्रदेशातील भाषेचे स्वरूप असते. इटली व युनानमध्ये भूपृष्ठाच्या स्वरूपाने भाषा व बोलीला प्रभावित केलेले आहे. डॉ. औदुंबर सरवदे यांनी याबाबत म्हटले आहे की, 'नकाशाच्या मदतीने एखादे भाषिक वैविध्य कोणत्या प्रदेशामध्ये आढळते हे स्पष्ट होते.'[३] प्रदेश आणि भाषा यांचा आंतरसंबंध राजनैतिक उपयोगाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. भाषा ही त्या राष्ट्राची प्राणशक्ती आहे.

### भाषा आणि राष्ट्र

भाषा आणि राष्ट्र यामध्ये महत्त्वाचा आणि जवळचा संबंध आहे. देशाचे संघटन तसेच विघटन भाषेवर अवलंबून असते. एखाद्या देशात भाषिक एकता विद्यमान असेल तर त्या देशाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. भाषिक विषमतेमुळे राष्ट्राच्या विकासातही बाधा निर्माण होते. याबाबत डॉ. माणिक धनपलवार म्हणतात, 'भारतामध्ये सांस्कृतिक चढउतार आणि विभिन्न प्रवाह भिन्न प्रदेशात व विभिन्न भाषातील साहित्यात काळानुसार प्रतिबिंबित झालेले दिसतात. याचे कारण या देशातील सांस्कृतिक जीवनाची मूलभूत एकात्मता हे देता येईल. ही एकात्मता कधी सुप्त असते तर कधी एखादे निमित्तकारण घडून मूळ रूपात अभिव्यक्त होते.'[४] एखाद्या राष्ट्रात राष्ट्रभाषेसोबत इतर भाषेचा विकास होत



Scanned by CamScanner

असताना त्या भाषा सांस्कृतिक एकतेला प्रभावित करतात. उदा. रोममध्ये राजकीय स्वातंत्र्यानंतरही लॅटिन आणि युनानी भाषा अजूनही विकसित आहेत. तसेच त्या भाषांचा प्रभाव तेथील सांस्कृतिक एकतेवर पडत आहे.

कोणत्याही भाषेच्या समृद्धीचे मापदंड त्या भाषेची व्यापकता आहे. विशिष्ट भाषेच्या विस्तारासोबत समकालीन संस्कृतीमध्ये स्थानप्राप्तीसाठी इतर भाषेचा वापरही आवश्यक आहे.

**पर्वत, पठार आणि भाषा**

पर्वतीय आणि पठारीय प्रदेश अशा प्रजातींना आश्रय आणि संरक्षण देतात, जे अन्य प्रजातींद्वारे तिरस्कृत किंवा भयक्रांत झालेले आहेत. यांची भाषा निकटवर्ती समुदायाच्या भाषेसोबत पृथक असते. पर्वतीय दऱ्याखोऱ्यांमधून काही प्रजाती प्रवास करतात. त्यामुळे भाषिक संमिश्रणाची प्रक्रिया घडते. अनेक संकीर्ण दऱ्याखोऱ्यांमध्ये तेथील प्रजातींची भाषा ही मूलावस्थेमध्ये असते. अशा प्रकारच्या भाषेचे उदाहरण नेपाळ, आल्प्स, कॉकेशस, हिन्दुकुश इत्यादी पर्वतीय प्रदेशांमध्ये आढळून येते. येथील भाषा मूलावस्थेत असल्याचे आढळून येते.

**मैदानी प्रदेश आणि भाषा**

मैदानी भागात विस्तृत भूभागावर अल्प भाषेचा विस्तार होत असतो. गंगेच्या मैदानी प्रदेशामध्ये भाषिक एकता दिसून येते. सोवियत रशियाच्या विस्तृत मैदानी भूभागावर रूसी (रशियन) आणि युक्रेनाई भाषेचा विकास झालेला आहे. मैदानी प्रदेशात जनसमुदाय केंद्रित वसाहतींमध्ये राहतो त्यामुळे भाषेतील एकसंघता दिसून येते. भाषा ही सर्वत्र एकसारखी नाही तर तिच्यात दर १२ मैलाच्या अंतरावर भाषेत बदल होत जातो. दोन वस्तीमधील अंतर तसेच गावा-गावांमधील अंतर कमी असल्याने मैदानी भागात भाषिक सातत्य आढळून येते. याउलट वाळवंटी प्रदेशात जनसमुदाय विखुरलेल्या वसाहतींमध्ये राहतो, त्यामुळे भाषेला बाधा निर्माण होते. या कारणाने तेथील भाषेमध्ये भिन्नता आढळून येते.

**समुद्र आणि भाषा**

प्राचीन काळापासून भाषेच्या संचाराच्या तसेच प्रसाराच्या माध्यमांमध्ये समुद्र किंवा समुद्र मार्गाने होणाऱ्या वाहतुकीद्वारे निर्माण होणारे नातेसंबंध कारणीभूत आहेत. कोणत्याही प्रदेशातील प्रवासी दुसऱ्या प्रदेशात आपल्या भाषेची छाप सोडत असतात. समुद्रांमध्ये असलेले बेट हे भाषेच्या दृष्टीने स्वतंत्र एकक होते.



Scanned by CamScanner

सागरी प्रवाशांच्या माध्यमातून प्रत्येक भागात दुसऱ्या प्रदेशातील भाषेतील शब्दांना पोहचविले गेले. त्यामुळे तेथील मूळ भाषा मिश्रित झाली आहे. अन्वेषण युगामध्ये अनेक संशोधकांद्वारे भाषेत अनेक नव्या शब्दांचा समावेश करण्यात आला.

भाषेवर प्राकृतिक पर्यावरणापेक्षा सांस्कृतिक पर्यावरणाचा अधिक प्रभाव पडत असतो. विकसनशील देशांसाठी हे विधान लागू होते. विकसित देश अविकसित देशांवर आपला प्रभाव टाकत असतात. त्यामुळे संस्कृती सोबतच त्या देशातील भाषेचा विस्तारही प्रभावाखालील देशांवर होत असतो. आधीच्या काळी काही बलाढ्य देश कमकुवत देशांवर आक्रमण करत आणि आपली सत्ता तेथे स्थापन करून आपल्या भाषेचे प्रभुत्व तेथे स्थापन करीत होते; पण त्या सोबतच आक्रमक सत्ताधारी त्या प्रदेशातील भाषेलाही अंगीकृत करत. त्यामुळे त्या देशावर शासन करण्यासाठी त्यांना मदत होत असे. इंग्रज भारतात आले. या ठिकाणी त्यांनी सत्ता स्थापन केली. राज्यकारभार करण्यासाठी आवश्यक असणारी त्या त्या प्रदेशाची भाषा तेथील ब्रिटिशांनी अवगत केली. काही ठिकाणी तर याच ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्या भाषेत अतिशय मोलाचे कार्य केल्याचे आपल्याला दिसून येते. मराठीचा विचार केला तर 'मोल्सवर्थ शब्दकोश' त्यापैकीच एक म्हणावा लागेल.

## भाषा आणि प्रजाती

'प्रजातींच्या भिन्नतेमुळे भाषेमध्येसुद्धा भिन्नता निर्माण होते. हे सत्य असले तरीही भाषा आणि प्रजातींमध्ये सरळ संबंध प्रस्थापित करता येत नाही; कारण जगातील अनेक प्रजातींची आपली स्वतःची भाषा नाही.'[५] ह्या प्रजाती ज्या समुदायात राहतात त्याच समुदायातील भाषेचा प्रयोग करतात. यहुदी अशी एक मानव प्रजाती आहे ज्यांची स्वतःची अशी कोणतीही भाषा नाही. आंग्ल भाषेचा उदय ब्रिटनमध्ये झालेला नाही, तर आंग्ल-सैक्सन, स्कँडेनेवियन आणि फ्रँको-जर्मन यांचा प्रभाव आंग्ल भाषेवर दिसतो. बहुतेक भाषा एकाकी आहेत. सद्यस्थितीत त्यांच्यावरही थोडाफार इतर भाषेचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे भाषांना प्रजातीच्या सीमारेषेत बद्ध करता येत नाही.

भाषेच्या विकासाचा इतिहास आहे. ऐतिहासिक कालखंडात यांच्यात पिढी दर पिढी परिवर्तन होत असल्याचे आपल्याला दिसून येते. भारतात मुघलांच्या आक्रमणामुळे फारसी भाषेचा, तर इंग्रजांच्या आक्रमणामुळे इंग्रजी भाषेचा प्रभाव



Scanned by CamScanner

होता. सध्याच्या युगातही इंग्रजी भाषेच्या प्रभावाचा अनुभव येतो.

## समारोप

भाषा ही सर्वात श्रेष्ठ सामाजिक संस्था आहे, कारण भाषेमुळेच मानवाचे सर्व व्यवहार शक्य होतात. ज्ञानप्राप्तीसाठी अथक प्रयत्न करावे लागतात. आपल्याला मिळालेले काही ज्ञान हे आपल्या पूर्वजांपासून आलेले आहे. मागच्या पिढ्यांचे अनुभव व ज्ञान भाषेमुळेच पुढच्या पिढीपर्यंत येऊन पोहोचते. तसेच हे उपलब्ध ज्ञान मिळविण्यासाठी नवीन पिढीला पुन्हा प्रयत्न करावे लागत नाही. हे सर्व भाषेमुळे शक्य झाले आहे. त्यामुळे भाषा हे मानवी प्रगतीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

अभिक्षेत्रीय वितरणाच्या दृष्टीने स्थानपरत्वे भाषा ही बदलत जात असल्याचे लक्षात येते. एकाच प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एकाच प्रकारच्या भाषेमध्ये अभिक्षेत्रीय दृष्टिकोनातून थोडीफार विविधता आढळून येते. अनेक शब्दांची तसेच त्यांच्या उच्चारणाची अभिक्षेत्रीय तफावत स्पष्ट दिसून येते. भाषेच्या अभिक्षेत्रीय अभ्यासात असे लक्षात येते की, पृथ्वीवरील बदलत्या स्थानानुसार तसेच भूस्वरूपानुसार भाषेतील बदल सर्वदूर आढळतो. भौतिक पर्यावरणाचा तसेच सांस्कृतिक पर्यावरणाचा भाषेवरही परिणाम होताना दिसतो.

भाषेच्या कालिक अभ्यासातून असे लक्षात येते की, बदलत्या काळानुसार भाषेचा समाजजीवनावर होणारा परिणाम एकसारखा नसतो. प्रत्येक भाषेचा इतिहास काळानुसार बदलत गेलेला आहे. भाषेच्या अभ्यासातून प्रत्येक काळातील समाजजीवनाकडे पाहण्याची वास्तववादी दृष्टी निर्माण झालेली आहे. कालगतीला अनुसरून भाषेमध्ये होणारे परिवर्तन हे समाजजीवनाच्या दृष्टीने अपरिहार्य बाब आहे. हे परिवर्तन कधी मंद गतीने तर कधी वेगाने झालेले आहे. जसे भाषेच्या इतिहासात बदल झाल्याचे निदर्शनास येते, तसेच भविष्यातही असे बदल होऊ शकतात, ही बाब नाकारता येणार नाही. भाषाविकास ही निरंतर प्रक्रिया आहे. ती सतत चालूच राहील. आज, उद्या आणि भविष्यातही.....

## संदर्भ

१) ना. गो. कालेलकर, भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९९९, पृ. ६२.

२) सुरेंद्र ग्रामोपाध्ये, भाषा व्यवहार व भाषा शिक्षण, कासेगाव



Scanned by CamScanner

एज्युकेशन सोसायटी, सांगली, २००६, पृ. ९.

३) औदुंबर सरवदे, बोलीविज्ञान, भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर २०२०, पृ. ७९.

४) डॉ. माणिक धनपलवार, दाक्षिणात्य साहित्य-संस्कृतीचा मराठीशी अनुबंध, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई, १९९७, पृ. १५६.

५) डॉ. गायत्री प्रसाद, सांस्कृतिक भूगोल, शारदा पुस्तक भवन, अलाहाबाद, २००२, पृ. १८९.

**- डॉ. संदीप रू. मसराम**
साहाय्यक प्राध्यापक (भूगोल)
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था, नागपूर.
मोबा. : ८९८३७१८१३१
Email : sandip.masram84@gmail.com

**- डॉ. सुधीर ब. मोरे**
साहाय्यक प्राध्यापक (मराठी)
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था, नागपूर.
मोबा. : ९४२२०००६११
Email : sudhirraomore@gmail.com

★ ★ ★

## अक्षरलेणं

काळ
इतका काळ
वाहून गेल्यावर
आज वाटते
काळ ही संकल्पना
शंकास्पद आहे.
अनाद्यंत विश्वाच्या
अस्तित्वाला
अंकित करण्यासाठी
माझ्या मनानं
निर्माण केलेली काळकल्पना
हेही एक अनुमान
कवीच्या प्रतिभेने निर्माण केलेलं,
माणसाला दिलेलं
त्याच्या व्यावहारिक सोयीसाठी
हे सोयीचं कारागृह
मी मानलंच पाहिजे का ?

**- कुसुमाग्रज**